पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १४९ ■ शनिवार, दि. ६ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ Email: citynewss80@gmail.com

## इंडिगोच्या आजही 350 फ्लाइट कॅन्सल





**3 लाख प्रवासी त्रस्त**

वृत्तसंस्था ६ डिसेंबर

**नवी दिल्ली/ भोपाळ/ लखनऊ:** देशातील सर्वात मोठी एअरलाइन कंपनी इंडिगोच्या कामकाजात सलग पाचव्या दिवशी शनिवारीही सुधारणा दिसून आली नाही. दिल्ली, मुंबई, बेंगळूरु आणि चेन्नई विमानतळांवर रात्रभर प्रवासी त्रस्त दिसले. यापूर्वी चार दिवसांत रद्द झालेल्या विमानांची संख्या २,००० पेक्षा जास्त झाली आहे. यामुळे सुमारे ३ लाख प्रवाशांना थेट फटका बसला.

आज आणि उद्या इंडिगोच्या २५-३० टक्के अधिक विमानांना रद्द किंवा उशीर होऊ शकतो. गेल्या ४ दिवसांत दररोज सरासरी ५०० विमानांना उशीर होत आहे, जी संख्या शनिवार आणि रविवारी ६०० पर्यंत पोहोचू शकते. याचे कारण असे की, शनिवार आणि रविवारी इतर दिवसांपेक्षा एक तृतीयांश अधिक विमाने चालवली जातात. इंडिगोचे म्हणणे आहे की, विमानसेवा सामान्य होण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत वेळ लागेल. मात्र, नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितले की, नवीननियम १ नोव्हेंबरपासून लागू आहेत, परंतु इतर कोणत्याही एअरलाइनला अडचण आली नाही, यावरून स्पष्ट होते की चूक इंडिगोची ➤ पान २ वर



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दिल्लीतील संसदेत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला आदींनी यांवेळी अभिवादन केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत, वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चैत्यभूमी, मुंबई येथे अभिवादन केले.

### एआयच्या युगात कोणतीही नोकरी सुरक्षित नाही- पिचाई

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**मुंबई :** सध्या जगभरात एआयचा बोलबाला सुरू आहे. एआयमुळे नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत, असेही बोलले जात आहे. यावर बोलताना गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी एक महत्त्वाचा इशारा दिला आहे. एआयच्या युगात कोणतीही नोकरी पूर्णपणे सुरक्षित नाही. तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याला नोकरीमधील मोठ्या बदलासाठी तयार राहायला हवे, असा सल्ला त्यांनी कर्मचारी वर्गाला दिला आहे.

एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत सुंदर पिचाई म्हणाले की, मनुष्याने आतापर्यंत ज्या ज्या टेक्नोलॉजीवर काम केले आहे, त्यात ➤ पान २ वर

### ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांची प्रकृती चिंताजनक

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**पुणे :** ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा आढाव यांची प्रकृती बिघडली असून त्यांना पुण्यातील पूना हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरु असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. डॉ. बाबासाहेब पांडुरंग आढाव हे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि श्रमिक चळवळीचे आधारस्तंभ मानले जातात. ते केवळ एक ज्येष्ठ समाजसेवक नसून, सत्यशोधक विचारांचे निष्ठावान अनुयायी आणि ➤ पान २ वर

### तब्बल ८ कोटींची लाच, दोघांना रंगेहाथ अटक

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**पुणे :** पुण्यामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सर्वात मोठी कारवाई केली असून तब्बल आठ कोटींची लाच मागणाऱ्या दोघांना रंगेहात पकडण्यात आले आहे. विनोद देशमूख (वय ५०), भास्कर पौळ (वय ५६) अशी आरोपींची नावे आहेत. दोन्ही आरोपींनी एकूण आठ कोटींची लाच मागितली होती. यांपैकी (३०, लाख रुपये) घेताना दोघांना रंगेहात पकडण्यात आले आहे. विश्रामनगर पोलिसांनी ही मोठी कारवाई केली आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांची ३२ गुंठे सोसायटी ➤ पान २ वर

## इंदू मिल स्मारकाचे ६ डिसेंबर २०२६ पूर्वी लोकार्पण!

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**मुंबई:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला वाहिलेलं भव्य स्मारक मुंबईतील इंदू मिल परिसरात उभारले जात आहे. या स्मारकाचे बांधकाम जलद गतीने सुरू असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्यांनी माहिती दिली की, पुढील महापरिनिर्वाण दिनाच्या आधी म्हणजेच डिसेंबर २०२६ पर्यंत हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यासाठी येत्या पावसाळ्यापूर्वी पुतळ्याचे मोठे स्ट्रक्चर तयार करण्याची योजना आखण्यात आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी चैत्यभूमी येथे महापरिनिर्वाण दिनानिमित्त बाबासाहेबांना अभिवादन करून ही माहिती दिली.

या स्मारकाचे महत्त्व सांगताना त्यांनी सांगितले की, सध्या ५० टक्के काम ➤ पान २ वर

### दोन्ही देशांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण करार!

**नवीदिल्ली :** भारत आणि रशिया यांच्यात फार पूर्वीपासून अनेक आघाड्यांवर सौहार्दपूर्ण संबंध राहिले आहेत. पंतप्रधान मोदींनी भारताचे हे परराष्ट्र धोरण कायम राखले. हे नाते फक्त ऐतिहासिक नव्हे, गेल्या काही वर्षांत अधिक मजबूत आणि आधुनिक झाले आहे. आता दोन्ही देशांनी उच्च-तंत्रज्ञान, अवकाश क्षेत्र, ➤ पान २ वर

## शेतक-यांच्या प्रश्नासह उद्योग संकटावर हिवाळी अधिवेशनात लक्ष वेधणार !- आ. बाळासाहेब मांगुळकर






प्रतिनिधी ६ डिसेंबर

**यवतमाळ :** पांढर सोन पिकविणारा जिल्हा म्हणून यवतमाळ जिल्ह्याची ओळख होती. मात्र जिल्ह्यात शेतकरी आत्महत्येने ही नोंद पुसली गेली आहे. येथील शेतकऱ्यांना त्यांच्या मेहनतीचा योग्य आर्थिक फायदा मिळत नाही. या गंभीर समस्येकडे लक्ष देत, आमदार बाळासाहेब मांगुळकर आगामी हिवाळी अधिवेशनात शेतकरी प्रश्नासह औद्योगिक संकटाचे मुद्दे सरकारकडे मांडणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

जिल्ह्यातील कापूस प्रक्रिया उद्योगांचा अभाव शेतकऱ्यांसाठी मोठा अडथळा ठरत आहे. 'मूल्यवर्धनाचा फायदा बाहेरील उद्योगांना जात असल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाखीची आहे,' असे आ. मांगुळकर यांनी स्पष्ट केले. जरी कापूस मोठ्या प्रमाणात उत्पादित होत असला, तरी शेतकऱ्यांना बाजारभाव न मिळाल्याने आर्थिक संकट वाढले आहे. औद्योगिक क्षेत्र देखील चिंतेचा विषय आहे. एमआयडीसी परिसरातील अनेक उद्योग बंद पडल्यामुळे स्थानिक तरुण बेरोजगार झाले आहेत. 'जिल्ह्यातील युवक रोजगाराच्या शोधात मोठ्या शहरांकडे पलायन करत आहेत. बंद उद्योगांचे पुनरुज्जीवन आवश्यक आहे, अन्यथा बेरोजगारीचा प्रश्न गंभीर राहील,' असे ते म्हणाले.

अलीकडील अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून शासनाकडून मिळणारी नुकसानभरपाई अपुरी ठरत आहे. यामुळे शेतकरी संकटात आहे असून, जिल्ह्याचा विकास मंदावला आहे. आमदार मांगुळकर यांनी शेतकऱ्यांसाठी तातडीची पुरेशी मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. हिवाळी अधिवेशनात आ. मांगुळकर हे कापूस प्रक्रिया उद्योगांसाठी विशेष पॅकेज, बंद पडलेल्या उद्योगांचे पुनरुज्जीवन आणि शेतकऱ्यांसाठी तातडीची मदत ➤ पान २ वर

## भाजपची मेगा तयारी, इतर पक्ष मात्र कोमात!

### अकोला महापालिकेच्या रणधुमाळीत राजकीय भूकंप

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अकोला :** अकोला महापालिकेच्या आगामी निवडणुकीची तारीख निश्चित नसतानाही, भाजपने आजपासून इच्छुक उमेदवारांकडून अर्ज स्वीकारण्यास सुरुवात करून राजकीय आखाड्यात अक्षरशः बॉम्ब टाकला आहे. गेल्या निवडणुकीत क्रमांक एकचा पक्ष असलेल्या भाजपने निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वीच उमेदवारांची चाचपणी सुरू केल्यामुळे इतर प्रमुख राजकीय पक्ष 'कोमात' गेल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

भाजपने इच्छुकांच्या अर्जाची प्रक्रिया सुरू करून मनोवैज्ञानिक युद्ध जिंकण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या निवडणुकीतील यशानंतर भाजपने आपला पाया अधिक मजबूत केला आहे. आजच्या गर्दीमुळे, महापालिका निवडणुकीत भाजपने आधीच ५० टक्क्यांहून अधिक लढाई जिंकल्याची भावना निर्माण झाली आहे. राजकीय जाणकारांच्या मते, विरोधी पक्षांची ही निष्क्रियता भाजपच्या पथ्यावर पडणारी आहे. निवडणुकीच्या तयारीसाठी वेळ असतानाही, काँग्रेस, वंचित आणि शिवसेनेचे नेते बैठकांसाठी एकत्र येण्यास तयार नसल्याने, त्यांच्यात समन्वय नाही आणि रणनीतीचा अभाव स्पष्ट दिसत आहे. या 'कोमात गेलेल्या' विरोधी पक्षांना भाजपच्या 'मेगा तयारी'चा सामना कसा करायचा, हा सर्वात मोठा आणि कठीण प्रश्न आहे. ➤ पान २ वर

#### काँग्रेस आमदाराचे स्वतंत्र कार्यालय


काँग्रेसमध्ये अंतर्गत बेदिली टोकाला पोहोचल्याचे चित्र आहे. आमदारांनी पक्ष कार्यालयापासून स्वतंत्र कार्यालय थाटले आहे. यामुळे, काँग्रेसमध्ये 'पक्षांतर्गत वाद उफाळला की पक्ष नेतृत्वाकडे आमदारांनी दुर्लक्ष केले?' या सत्य प्रश्नाचे उत्तर शोधणे कठीण झाले आहे. गटबाजीमुळे काँग्रेसचे महापालिका निवडणुकीतील आव्हान सुरुवातीलाच खिळखिळे झाले आहे. महाविकास आघाडीचा घटक असूनही शिवसेनेच्या हालचाली ➤ पान २ वर

### अकोल्याचा 'अर्णव साठे' महाराष्ट्र क्रिकेट संघात!



प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अकोला :** अकोल्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाची आणि अभिमानास्पद भर पडली आहे. येथील डवले माध्यमिक विदयालय, मोठी उमरी येथील उदयोन्मुख क्रिकेटपटू अर्णव मोहन साठे याची महाराष्ट्र शासनातर्फे आयोजित शालेय क्रीडा स्पर्धेसाठी राज्यस्तरीय क्रिकेट संघात निवड झाली आहे. वयोगट १७ वर्षांखालील ➤ पान २ वर




CMYK CMYK



चेंबूर येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी पुष्पहार अर्पण करून वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर यांनी अभिवादन केले.



महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर आणि प्रा. अंजलीताई आंबेडकर यांनी महामानव अभिवादन केले.

यावेळी असंख्य अनुयायी तसेच वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.- चैत्यभूमी, मुंबई



शिवसेना उबाठाचे नेते उद्धव ठाकरे, युवानेते आदित्य ठाकरे यांच्यासह शिवसेना नेते आणि पदाधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाणदिनी अभिवादन केले.

## पान १ वरून ...

### एआयच्या युगात कोणतीही ....

एआय सर्वात सखोल तंत्रज्ञान आहे. एआयमधून असंख्य फायदे मिळण्याची शक्यता आहे. एआय नोकऱ्यांमध्ये काही बदल घडवून आणेल, यात शंका नाही. त्यामुळे लोकांनी परिस्थितीशी जुळवून घ्यायला हवे. सध्या जगभरात असे काही क्षेत्र आहेत, जेथे एआयचा नोकऱ्यांवर परिणाम होईल. त्यामुळे आपण यावर चर्चा करायला हवी. आजचे सीईओ ज्या जबाबदाऱ्या सांभाळतात, त्या आगामी काळात एआय सिस्टमद्वारे आरामात पार पाडल्या जाऊ शकतील. हे सांगण्यामागचा उद्देश भीती पसरवणे नसून भविष्यात होणाऱ्या बदलांचे परिणाम अधोरेखित करणे आहे. एआय ज्या ज्या वेळी निर्णय घेण्यात आणि कार्य करण्यात सक्षम होईल, त्या त्या वेळी कामाचे स्वरूप विकसित होईल. लोकांना आता केवळ पारंपरिक पात्रतेवर अवलंबून राहता येणार नाही. त्यांना काळाशी अनुरूप राहण्यासाठी नवीन डिजिटल साधने वापरण्याची क्षमता विकसित करावी लागेल, असे सुंदर पिचाई म्हणाले.

### ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा ...

कष्टकऱ्यांचे नेते आहेत. त्यांनी आपले संपूर्ण जीवन असंघटित आणि वंचित कष्टकरी, विशेषतः हमाल, रिक्षाचालक आणि बांधकाम मजुरांचे संघटन करून त्यांना न्याय, सामाजिक सुरक्षा आणि सन्मान मिळवून देण्यासाठी समर्पित केले. त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'हमाल पंचायती'ची स्थापना, ज्याच्या माध्यमातून त्यांनी पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हमालांना संघटित केले. जातीय भेदभावाविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी 'एक गाव एक पाणवठा' या क्रांतीकारी चळवळीचे नेतृत्व केले आणि समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

### तब्बल ८ कोटींची लाच, दोघांना ...

जमीन पुण्यात कॅन्टोन्मेंट क्षेत्रात आहे. ते २००५ नंतर या जमिनीची नवी ७/१२ उतारा, नवीन नकाशे यासाठी तक्रारदार वारंवार सरकारी कार्यालयात पाठपुरावा करत होते. मात्र २०२० पासून तक्रारदारांचे काम काही केल्या होत नव्हते. हे काम करायचे असेल तर सरकारी अभिलेख विभागातील काही अधिकारी व मध्यस्थांमार्फत 'लाच देणे गरजेचे आहे' अशी मागणी सुरू असल्याची तक्रारदारांना कल्पना दिली गेली.अलीकडे दोन आरोपींनी तक्रारदारांशी संपर्क साधून ८ कोटी रुपये दिले तरच जमीन नोंदणी व इतर कागदपत्रे मिळतील असे सांगितले. या वर्षी (२०२५) आरोपींनी तक्रारदारांच्या घरच्या सदस्यांकडेही संपर्क केला, त्यांना मानसिक त्रास दिला आणि पैशाची जोरदार मागणी केली.

### इंदू मिल स्मारकाचे ६ डिसेंबर ....

पूर्ण झाले आहे. सर्वात मोठे आणि तांत्रिक काम म्हणजे पुतळ्याची उभारणी आहे. या पुतळ्याचा पाया जवळपास १०० फूट उंचीचा असणार आहे आणि त्यावर ३५० फूट उंचीचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य पुतळा उभा राहणार आहे. हा पुतळा उभा झाला की, मुंबईच्या आकाशात तो दूरूनही दिसेल असा भव्य आकार याला असेल. पूर्ण स्मारक हे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि आकर्षक रचनेसह उभारले जात आहे.

फडणवीस यांनी बाबासाहेबांच्या कार्याचा उल्लेख करताना सांगितले की, भारतात पूर्वी सामाजिक विषमता खूप होती. अनेकांना मानव म्हणूनही वागणूक दिली जात नव्हती. त्या वेळी बाबासाहेबांनी मोठा संघर्ष केला. त्यांनी शिक्षण मिळवलं, ज्ञान वाढवलं आणि समाजाला उठवून उभं केलं. सर्वांना समान न्याय मिळावा यासाठी त्यांनी भारताचे संविधान बनवलं. त्यांनी जात-धर्म बाजूला ठेवून प्रत्येक नागरिकाला समान हक्क दिला. त्यामुळेच भारताच्या प्रगतीची पायाभरणी झाली.

हे स्मारक उभारताना बाबासाहेबांच्या विचारांची आणि संघर्षाची आठवण सर्वांना होईल, अशी सरकारची इच्छा आहे. हे स्मारक केवळ एका समाजापुरते नाही, तर सर्व भारतीयांसाठी आहे. सामाजिक न्याय, समानता, बंधुता आणि मानवतेचा संदेश हे स्मारक पुढील पिढींना देणार आहे. त्यामुळेच या स्मारकाचे बांधकाम वेळेवर आणि उत्तम गुणवत्तेत करण्याची जबाबदारी प्रशासनावर आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, कोणत्याही अडचणी न आल्यास पुढील महापरिनिर्वाण दिनी या स्मारकाचे लोकार्पण करता येईल.सरकार आणि बांधकाम विभागाकडून काम वेगाने सुरू आहे. आर्थिक तरतूद, तांत्रिक साधने, कामाचे नियोजन आणि सुरक्षा लक्षात घेऊन बांधकाम सुरू आहे. मुंबईतील महत्त्वाचा प्रकल्प असल्यामुळे लोकांचेही लक्ष या कामाकडे आहे. नागरिकांमध्येही या स्मारकाबद्दल मोठी उत्सुकता आहे. आगामी काही महिन्यांत पुतळ्याचे स्वरूप आणि स्मारकाचा अंतिम टप्पा स्पष्ट होणार आहे. हे स्मारक पूर्ण झाल्यावर मुंबईच्या पर्यटनातही नव्या आकर्षणाची भर पडेल. आंबेडकरांचे स्मारक ही केवळ वास्तू नसून समाजाला दिशा देणारे प्रेरणास्थान राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### दोन्ही देशांमध्ये अनेक...

आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि नव्या पिढीच्या तंत्रज्ञानांमध्ये सहकार्य वाढवले आहे. ही भागीदारी केवळ कूटनीती नाही, तर खऱ्या प्रगतीचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी केले.

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज दिल्लीतील हैदराबाद हाऊस येथे महत्त्वपूर्ण बैठक झाली. या बैठकीत दोन्ही देशांमध्ये अनेक महत्वपूर्ण करार झाले. यादरम्यान, पुतिन यांनी पहिल्यांदाच रशिया-युक्रेन युद्धावर स्पष्टपणे भाष्य केले. यावेळी दोन वर्षांहून अधिक काळ सुरू असलेल्या युक्रेन-रशिया युद्धावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही भारताची भूमिका मांडली.रशिया आता अमेरिकेसह अनेक देशांसोबत युक्रेन युद्ध संपवण्यासाठी शांततामय पर्यायांवर विचार करत असल्याची प्रतिक्रिया पुतिन यांनी दिली. दोन्ही नेत्यांत झालेल्या बैठकीदरम्यान पुतिन म्हणाले, युक्रेन प्रकरणावर भारताने नेहमीच गंभीर, संतुलित आणि जबाबदार भूमिका घेतली आहे. आम्ही भारताच्या या भूमिकेला खऱ्या अर्थाने महत?त्व देतो आणि याला शांती प्रक्रियेतील सकारात्मक योगदान मानतो.

यावेळी मोदी म्हणाले, दहशतवादाविरोधातील लढाईत भारत आणि रशियाने दीर्घकाळापासून खांद्याला खांदा लावून सहकार्य दिले आहे. भारताची भूमिका कायम शांततेच्या बाजूने आहे. जागतिक नेत्यांशी चर्चा करत असताना आमची ही भूमिका वेळोवेळी मांडत आलो आहे. जगाने आता शांततेच्या मार्गावर परतले पाहिजे. आम्ही शांततेच्या प्रत्येक प्रयत्नांना पाठिंबा देऊ. युक्रेन संघर्षात भारत तटस्थ नाही.भारत शांततेच्या बाजूने आहे. ऊर्जा सुरक्षा क्षेत्रात भारत-रशिया भागीदारी मजबूत आणि महत्त्वाचा स्तंभ राहिला आहे. नागरी अणुऊर्जेच्या क्षेत्रात आपले दशकांहून जुने सहकार्य, स्वच्छ ऊर्जेप्रती आपल्या सामायिक प्राधान्यक्रमांना सार्थकी लावण्यात महत्वाचे ठरले आहे. मनुष्यबळाची गतिशील देवाणघेवाण, आपल्या नागरिकांना जोडण्यासोबतच दोन्ही देशांसाठी नवी ताकद आणि नव्या संधी निर्माण करेल.

### शेतकऱ्यांच्या प्रश्नासह...

यांसह इतर संबंधित मुद्द्यांवर सरकारकडे स्पष्ट प्रस्ताव मांडणार आहेत. यवतमाळमधील 'पांढऱ्या सोन्याचा' फायदा स्थानिक शेतकरी, युवकांसाठी सुनिश्चित करणे तसेच जिल्ह्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासाला गती देणे ही आता जिल्ह्याची प्राथमिक गरज ठरली आहे. शासन या मुद्द्यांकडे कितपत गांभीर्याने लक्ष वेधते, हे हिवाळी अधिवेशनात स्पष्ट होणार आहे.

### भाजपची मेगा तयारी...

**'कमळ' दारात इच्छुकांची लाईनः विरोधी पक्षांचे दरवाजे कुलूपबंद!**

महापालिकेचे वारे कोणत्या दिशेने वाहत आहेत, याचे स्पष्ट संकेत दोन दिवसात मिळाले. भाजपच्या पक्ष कार्यालयात उमेदवारी अर्ज घेण्यासाठी अक्षरशः रांगा लागल्या होत्या. पहिल्याच दिवशी शंभराहून अधिक इच्छुकांनी अर्ज घेऊन विविध प्रभागांवर आपला दावा ठोसपणे निश्चित केला. भाजपचे जिल्हा निवडणूक प्रभारी रणधीर सावरकर, शहर निवडणूक प्रभारी विजय अग्रवाल आणि शहर अध्यक्ष जयंत मसने यांच्या नेतृत्वाखाली ही प्रक्रिया धडाक्यात सुरू झाली आहे.याउलट, एकेकाळी अकोल्याच्या राजकारणात दबदबा असलेल्या काँग्रेस, शिवसेना आणि वंचित बहुजन आघाडी या प्रमुख पक्षांच्या कार्यालयांमध्ये सन्नाटा पसरला होता. वंचित बहुजन आघाडीचे कार्यालय आज बंद होते. 'वंचित' केवळ जिल्हा परिषदेच्या निवडणुकीतच रस दाखवत आहे का? महापालिकेच्या शहरी राजकारणातून त्यांनी माघार घेतली आहे काय? असा धारदार प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे.

### काँग्रेस आमदाराचे स्वतंत्र ...

थंडावल्या आहेत. मित्रपक्षांची एकत्र बसण्याची तयारी दिसत नसताना, शिवसेनेची भूमिका अजूनही अस्पष्ट आहे.

### अकोल्याचा 'अर्णव साठे' महाराष्ट्र ...

(२०२५-२०२६) या गटासाठी अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करताना अर्णवने ही चमकदार कामगिरी केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या शालेय क्रीडा स्पर्धांच्या राजस्तरीय निवड चाचणीसाठी अर्णव साठेची निवड झाली होती. ही चाचणी दि. ४ डिसेंबर रोजी शिर्डी येथे पार पडली. राज्यातील निवडक आणि सर्वोत्तम खेळाडूंमधून निवड समितीने अर्णवची कामगिरी लक्षात घेऊन त्याची थेट राज्यस्तरीय क्रिकेट टीममध्ये सिलेक्शन झाले. अर्णव साठे याच्या या यशामागे अकोल्याचे सुप्रसिद्ध रणजी ट्रॉफी खेळाडू रवी ठाकूर यांचे अथक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण आहे. ठाकूर हे सध्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन, नागपूर येथे सहाय्यक प्रशिक्षक, जुनियर क्रिकेट म्हणून कार्यरत आहेत. एका अनुभवी आणि राष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या खेळाडूच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण मिळाल्याने अर्णवच्या खेळाला योग्य दिशा मिळाली आहे. अर्णवच्या या निवडीमुळे डवले माध्यमिक विदयालय आणि अकोला जिल्ह्याच्या क्रीडा वर्तुळात उत्साहाचे वातावरण आहे. त्याच्या पुढील राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय स्तरावरील वाटचालीस भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

## पान ६ वरुन...

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त...

पुतळ्याभोवती मंद प्रकाशात तेवणाऱ्या मेणबत्तीच्या प्रकाशात अशोक वाटिका परिसराचे रूप उजळून निघाले होते अत्यंत शिस्तबद्ध रीत्या निघालेल्या या कॅन्डल मार्च ने शहरातील सर्वच नागरिकांचे लक्ष वेधून घेतले होते सर्वांनी आपापल्या परीने महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन केले

### भाजी बाजार...

की काय आता पार्किंगच्या आजुबाजूला मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला दिसतो. गायी, डुकरे फिरत असतात. बाजूला फळांच्या गाड्या उभ्या असतात. त्यामुळे भाजी खरेदी साठी येणाऱ्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न देखील उभा ठाकला आहे. विविध समस्या सोडवाव्या अशी मागणी केली जात आहे. या भागातील बजबजपुरी बाबतीत नाराजी व्यक्त होत आहे.

### सावकारग्रस्त...

नेतृत्व समितीचे संस्थापक अध्यक्ष नेताजी अरुण जाधव, प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब भाबट (खादगावकर), अध्यक्ष रमेश पाटील खिरकर, महिला प्रदेशाध्यक्षा सुनीता ताथोड, कार्याध्यक्ष अशोकराव वाटणे, नाशिक विभागीय अध्यक्ष दिपक जाधव, अमरावती विभागीय अध्यक्ष गणेश माथाणकर, औरंगाबाद जिल्हा अध्यक्ष अमोल आळंजकर, कोल्हापूर विभागीय अध्यक्ष संतोष कांबळे आदीजण करणार आहेत.

समितीने राज्यातील सर्व सावकारग्रस्त शेतकरी व नागरिकांना १२ डिसेंबरला नागपूर येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### माता न तू वैरिणी...

परिस्थितीत राहत असल्याचेही उघड झाले. नेहमीच हातात चाकू घेऊन फिरत असल्याने या महिलेची नागरिकात विशेषता महिला आणि लहान मुलांमध्ये चांगलीच भीती निर्माण झाली होती!

मानसिकदृष्ट्या आजारी महिला नेहमीच परिसरातील नागरिकांना शिवीगाळ करत होती, वेळप्रसंगी त्यांच्यावर हल्ला करण्यास सुद्धा मागेपुढे पाहत नव्हती, तसेच नागरिकांच्या घराच्या गेटवर लाथ मारणे, दगड फेकणे, आदी प्रकार नित्याचे झाले होते. ही महिला सोबत नेहमी चाकू घेऊन फिरत असल्यामुळे परिसरातील मुलांचा जीव धोक्यात आला होता. पोलिसांनी घरात प्रवेश करून लाकडी पलंगाच्या कप्प्यात दाबून ठेवलेल्या या महिलेच्या मुलाला बाहेर काढून त्याची सुटका केली, या लहान मुलाला त्याच्या आईने कपाटाच्या कप्प्यात बांधून ठेवले होते. मुलावर वैद्यकीय उपचार केल्यानंतर त्याला त्याच्या नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. मुलाला वाचवण्यात आले. मानसिकदृष्ट्या आजारी महिलेने काही दिवसांपूर्वी तिच्या वडिलांचीही हत्या केली असल्याची खळबळ जनक माहिती समोर आली आहे. साईनाथ कॉलनी परिसरातील सर्व रहिवाशांनी काही वर्षांपूर्वी या महिलेने तिच्या वडिलांची हत्या केल्याचा आरोप करत पोलिस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आणि बंदोबस्त करीत संरक्षणाची विनंती केली होती. महिलेला उपचारासाठी यवतमाळ येथील नंदादी फाउंडेशनच्या मानसिक आरोग्य उपचार केंद्रात पाठविण्यात आले या मनोरुग्ण महिलेची मानसिक आरोग्य उपचार केंद्रात रवानगी झाल्याने परिसरातील नागरिकांनी सुटकेचा श्वास टाकला ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक अर्पित चांडक अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खदान पोलीस स्टेशनचे ठाणेदार मनोज केदारे व त्यांच्या टीमने केली

### शेगाव येथे...

एक्झिक्यूटिव्ह कमिटी मीटिंगमध्ये मान्यता देऊन नवनिर्वाचित कार्यकारणीने राज्याचा पहिला मान मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यातील संत गजानन महाराज नगरीला मान दिला आहे. राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे, प्रवीण दरेकर, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, खासदार रक्षा खडसे, पालकमंत्री मकरंद आबा पाटील, सह पालक मंत्री संजय सावकारे, अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर, आ. संजय कुटे, आ. चैनसुख संचेती, आ. धीरज लिंगाडे, आ. संजय गायकवाड, आ. श्वेता महाले आ. मनोज कायंदे, आ. सिध्दार्थ खरात हे उपस्थित राहणार आहेत. बुलढाणा जिल्ह्याचे कार्याध्यक्ष विठ्ठलराव लोखंडकार, संतोष आंबेकर, विनोद टिकार, आणि संकेत धामंदे स्पर्धेचे आयोजन करीत आहे. तरी सर्व खेळाडू व क्रीडाप्रेमींनी या स्पर्धेचा आनंद घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### प्रधान सचिव...

आपल्या २७ अधिकाऱ्यांसह मेळघाट दौऱ्यावर आले असता दौऱ्यामध्ये नियोजन नसलेल्या गावात लोकांनीच भेटीची तयारी दाखवून हरीसाल ग्रामपंचायत मधील चित्री गट ग्रामपंचायत येथे मा. प्रधान सचिव यांचा ताफा थांबवून स्थानिकानच्या समस्या सांगण्यात आल्या, तसेच चित्री गावात दहा वर्षापासून कुपोषित बालक, त्याच बरोबर एकही बाल मृत्यू, माता मृत्यू नसल्याचे सांगितले.यावेळी गावातील पोलिस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, बचत गटातील महिला, डॉ. दिशा भारत वरठे, उत्तम शेळके, प्रकाश वाजगे, गणेश कणसे, जवानसिंग वाजगे, अनिता शेळके, कला वाजगे, कोणगीबाई येवले, निलेश भटकर, काशीराम मुजलदा, वरील गावकरी यांनी समस्याचे आवेदन देण्यात आले. याचिकाच्या माध्यमाने का होईना मा. प्रधान सचिव व इतर मंत्रालयीन अधिकारी मेळघाट दौऱ्याला आले असता नियोजित दौरा नकरता अचानक दौरा केल्याने मुख्य अडचणी नकीच समोर येणार, असे जनसामान्यांमध्ये चर्चेला उधाण येत असल्याचे दिसून आले. दोऱ्या दरम्यान पाणी पुरवठा योजना, अंगणवाडी, शाळा, सरकारी दवाखाने, उपकेंद्र, ची पाहणी करून कर्मचारी सोबत संवाद साधून आदिवासी बहुल भागातील जनतेकरीता शासनामार्फत पुरविण्यात येणारी सोयी सुविधा उपलब्ध करूनही पाहिजे तेवढा परिणाम का मिळत नाही या विषयी सविस्तर चर्चा करून रिक्त असलेले पदे भरून जनसामान्यांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असे सांगण्यात आले. झालेला मेळघाट दौरा व पुढील उपाययोजना करण्यासाठी दिनांक ६ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन केले आहे.या बैठकीत काय निर्णय ,उपाययोजना होणार याकडे मेळघाटवासीयांचे लक्ष वेधले जात आहे. यावेळी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी संचिता महापात्रा यांची उपस्थिती होती.

### पोलिसांविरुद्धच्या तक्रारींसाठी ...

कार्यालय फेब्रुवारी २०२५ पासून अमरावती येथे कार्यान्वित झाले असून कार्यालयाचा पत्ता: विशेष आय.जी.पी. बंगला ते शासकीय विश्राम गृह रोड, गुलमोहर अपार्टमेंटचे बाजूला, कॅम्प, अमरावती-४४४६०२ असा आहे. नागरिकांच्या संपर्कासाठी दूरध्वनी- ०७२१/२९९०३०६ तर ई-मेल: ्र्जे.र्सैर्ज्दत्म्ु्दन.ग्ह याप्रमाणे आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या (प्रकाश सिंग प्रकरण २००६) आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने अमरावती येथे उपरोक्तप्रमाणे प्राधिकरण स्थापन करण्यात आले असून पोलिसांना कायद्याने दिलेल्या अधिकारांचा गैरवापर किंवा त्यांच्याकडून झालेल्या गैरवर्तनाबाबत नागरिकांच्या तक्रारींची निष्पक्ष चौकशी करणे हा मुख्य उद्देश आहे. हे प्राधिकरण वरिष्ठ पोलीस निरीक्षकांपर्यंतच्या (एाहग्दे इदत्म ध्हेजम्दे) दर्जाच्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्दच्या तक्रारींची चौकशी करण्याचे अधिकार या प्राधिकरणास आहे. तसेच पोलीस उप-अधीक्षक किंवा त्यावरील दर्जाच्या अधिकाऱ्यांविरुध्दच्या तक्रारी राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाकडे (मुंबई) केल्या जातात. पोलीस कोठडीतील मृत्यू किंवा गंभीर दुखापत, बलात्कार किंवा बलात्काराचा प्रयत्न, विहीत कार्यपध्दती न अनुसरता केलेली अटक, भ्रष्टाचार, खंडणी उकळणे, जमीन किंवा घर बळकावणे, इतर गंभीर कायदेशीर उल्लंघन किंवा कायदेशीर अधिकाराचा दुरुपयोग आदी तक्रारींवर व गंभीर गैरवर्तन संदर्भात प्राधिकरणाला चौकशी करण्याचे अधिकार आहे.

तक्रार दाखल करण्याची प्रक्रिया :

तक्रार लेखी स्वरुपात (मराठी, हिंदी किंवा इंग्रजीमध्ये) साध्या कागदावर किंवा प्राधिकरणाच्या वेबसाईटवर ऑनलाईन स्वरुपात दाखल करता येते. तक्रार दाखल करण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. प्राधिकरण तक्रारींची नोंद घेते, त्याची चौकशी करते तसेच चौकशीत तथ्य आढळल्यास, प्राधिकरण संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस शासनाकडे करते.

महाराष्ट्रातील विभागीय प्राधिकरणे : अमरावतीसह पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजी नगर आणि कोकण विभाग (नवी मुंबई) येथे एकूण सहा विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणे कार्यरत आहेत.

### ग्रामीण पाणीपुरवठा...

कारणांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी. संघटनेचे अध्यक्ष पंकज गुल्हाने यांनी म्हटले आहे की, 'कर्मचाऱ्यांना उपजीविकेची साधी हमीही न मिळणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा.' अशा मागण्या कर्मचाऱ्यांनी केले आहे.

### पीआरपोटे पाटील...

डॉ. आर. एस. महामुने (एएउर्श शेगाव), डॉ. नीरजा धर्माळे (शेगाव) आणि श्री. सचिन रिंधे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमादरम्यान संशोधन पद्धती, बौद्धिक संपदा हक्क (घ्ढ्ढं), निधी प्रस्ताव लेखन, उद्योग–शैक्षणिक सहयोग, तसेच आधुनिक संशोधनाच्या गरजा या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. महाविद्यालयातील सर्व विभागांतील प्राध्यापकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाला संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके यांचे दूरदर्शी मार्गदर्शन लाभले. यशस्वी आयोजनासाठी विभाग प्रमुख डॉ. व्ही. बी. कुटे, प्रा. गावंडे आणि संपूर्ण ॲ टीम यांनी प्रभावी नियोजन व समन्वय करून उल्लेखनीय योगदान दिले. महाविद्यालयात संशोधनप्रधान वातावरण निर्मितीसाठी असे उपक्रम भविष्यातही राबविले जाणार असल्याचे संबंधितांनी सांगितले.

## पान ३ वरुन...

### कृषी विभागामार्फत ...

योग्य व्यवस्थापन आवश्यक असून मातीचे रक्षण हे थेट शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेशी निगडित आहे.

जागतिक मृदा दिनाच्या निमित्ताने झालेल्या जनजागृतीत मातीद्वारे मिळणाऱ्या पर्यावरणीय सेवांवर विशेष भर देण्यात आला. अन्न उत्पादनाबरोबरच पाणी गाळण, तापमान नियंत्रण, कार्बन संचयन आणि जैवविविधता संरक्षणामध्ये मातीचे अप्रतिम योगदान असल्याचे कृषी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. वाढत्या रासायनिक खतांच्या वापरामुळं मातीचे आरोग्य धोक्यात येत असल्याने शाश्वत उपाययोजना अवलंबण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली. शेतकऱ्यांना सेंद्रिय खतांचा वापर वाढवणे, पीक फेरपालट करणे, हिरवळीचे खत पिकवणे, मल्चिंगचा अवलंब करणे तसेच पावसाच्या पाण्याचे संधारण करणे यांसारख्या पद्धतींचे प्रशिक्षण देण्यात आले. माती वाचवा – भविष्य वाचवाङ्ग हा संदेश यावेळी देण्यात आला.

मातीचे आरोग्य सुधारण्यासाठी शाश्वत शेतीपद्धती अवलंबणे अत्यंत आवश्यक आहे. जागतिक मृदा दिनानिमित्त शेतकऱ्यांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद उत्साहवर्धक आहे. पुढील काळात माती परीक्षण, सेंद्रिय खतांचा वापर आणि जलसंधारणावर अधिक भर दिला जाईल.

दीपक तायडे , तालुका कृषी अधिकारी

### मूर्तिजापूरातील इंग्रजी ...

अत्यावश्यक असताना, अनेक शाळांकडून संपूर्ण सत्र संपत आले तरीही विद्यार्थ्यांना ओळखपत्रे दिली जात नसल्याचे पालकांचे म्हणणे आहे. ओळखपत्रांसाठी आधीच आकारलेले पैसे मात्र शाळा घेतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकडे शाळांकडून उघडपणे दुर्लक्ष होत आहे का? असा गंभीर प्रश्न समोर येत आहे. काही शाळांच्या मैदानांबाबत पालकांनी केलेल्या तक्रारी अधिक चिंताजनक आहेत. मैदानात साचलेली घाण, वाढलेले गवत, अस्वच्छ परिसर यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत खेळायला गेलेल्या किंवा मैदानातून जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार, असा थेट सवाल पालकांनी उपस्थित केला आहे.

पालकांचा असा आरोप आहे की काही शाळा आधुनिक सजावटीच्या नावाखाली ठइंग्रजी माध्यमठ या टॅगचा फायदा घेत आहेत. रंगीत भिंती, आकर्षक प्रवेशद्वारे, सेल्फी पॉईंट्स यावर पैसा खर्च केला जात असताना खऱ्या अर्थाने अभ्यासक्रम, शिक्षकांची गुणवत्ता, शैक्षणिक सुविधा यावर पुरेसा भर दिला जात नाही. शैक्षणिक क्षेत्रात वाढती स्पर्धा, शाळांचा ब्रँडिंगकडे कल आणि पालकांचे आकर्षण या सर्वांचा परिणाम म्हणून ठडेकोरेशन-आधारित शिक्षणठ अशी चिंताजनक प्रवृत्ती मूर्तिजापूरात दिसू लागली आहे. पालक, शिक्षणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांनी याबाबत योग्य तपासणी, नियमन आणि शैक्षणिक मानकांची कठोर अंमलबजावणी करण्याची मागणी केली आहे. अनेक पालकांनी व्यक्त केलेल्या नाराजीनुसार, शाळेची फी भरल्यानंतर दिल्या जाणाऱ्या पावतीवर ठट्युशन फीठ असा उल्लेख असतो. तरीही अनेक शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना बाहेरून ट्युशन लावण्याचा सल्ला पालकांना दिला जातो.

याबाबत संबधित मुख्याध्यापक यांची मीटिंग बोलावून सुचना देण्यात येतील,नियमभंग आढळल्यास योग्य ती कारवाई करण्यात येईल.

वैशाली रामटेके, गटशिक्षणाधिकारी, पं.स. मूर्तिजापूर

### पंचशीलनगरात डॉ. बाबासाहेब ...

आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले.

अभिवादन कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्त्या गीता गजानन गवई, आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्या मंगलाबाई तेलगोटे, कुसुम वाकोडे, वच्छलाबाई दा?भाडे, देवका अंभोरे, चंद्रकला जामनिक, विमल सदांशिव, कमला आठवले, फुलावती वानखडे, छाया पाखरे, रुंदा तेलगोटे, विमल तायडे, अनिता दाभाडे, संगीता उपर्वट, अनिता अंभोरे, मंगला तायडे, मंगला वरठे, चंद्रकला तायडे, विशाखा तेलगोटे, स्वाती सुरवाडे, माला शेगोकार, कांता शिरसाट, बबली गवई, सुनिता अदमाने, छाया दाभाडे, रेश्मा तायडे, सोनु इंगळे, मिरा गवई, वंदना गवई, प्रमिला इंगळे, गौकर्णा हिवराळे, अंजली वाकोडे, संगीता वाकोडे, शिला दाभाडे, छाया तेलगोटे, भाविका अंभोरे, माया तायडे, मनोरमा शिरसाट, मनोरमा तायडे, नुतन मोहोड, पूनम गवई यांच्यासह परिसरातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ग्रामीण पोलिसांची ...

रा. विजय टॉकीजजवळ, अकोट, त्यांच्या अंगझडतीतून १३,१७० नगदी, ५२ पत्त्यांचा संच, तसेच एमएच ३० एएस ४३६७ क्रमांकाची मोटरसायकल (किंमत ?५५,०००) असा एकूण ?६८,१७० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला,आरोपींविरुद्ध अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशान्वये, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत बी. रेड्डी व सहा. पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार किशोर जुनघरे, पोउपनि मिनाक्षी काटोले, पो.हे.कॉ. विठठल चव्हाण, पोकॉ शैलेश जाधव, पोकॉ शुभम लुंगे, पो.कॉ. राजेश माळेकर व पो.कॉ. सुनिल पाटील यांच्या पथकाने केली.

### उज्वल पब्लिक स्कूलमध्ये ...

टाकला. त्यांनी विद्यार्थ्यांना संविधानाचे महत्त्व, सामाजिक समतेचे मूल्य आणि शिक्षणाचे बळ याबाबत मार्गदर्शन केले. शाळेच्या प्रशासकीय अधिकारी सौ. नीता राजेंद्र बोबडे यांचीही कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यानंतर दोन मिनिटे मौन पाळून बाबासाहेबांना आदरांजली अर्पण करण्यात आली. विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या विचारांवर आधारित भाषणे, समूहगीत, नाट्यछटा व घोषवाक्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. ठशिका, संघटित व्हा आणि संघर्ष कराठ या बाबासाहेबांच्या घोषवाक्याचा प्रभावी संदेश विद्यार्थ्यांनी सादरीकरणातून दिला. कार्यक्रमात निबंध लेखन, वक्तृत्व आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षकांनीही बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्यांची जाणीव करून दिली. कार्यक्रमाला सौ. प्रीती वाघमारे, सौ. दिपाली देशमुख, सौ. स्वाती जैन, सौ. मीना सराटे, प्रशांत होणाळे, सौ. कुमुद काटोले, सौ. दुर्गा असेलमोल, कु. मोहिनी इंगळे, सौ. शारदा देशमुख, सौ. अश्विनी माहुलकर, श्रीमती स्मिता पाटील, कु. साक्षी इंगळे, सौ. रुपाली कडू, सौ. जया हगवणे, सौ. पूजा तळोटकर, प्रतीक वानखडे, सौ. पूजा गावंडे आणि सौ. रूपाली इंगळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी ठजय भीमठ चा जयघोष केला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प केला.

### खेंडकर ज्ञानगंगेमध्ये...

करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी भाषण स्पर्धेमध्ये आपला सक्रिय सहभाग नोंदविला. यावेळी प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनातून ,"डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे परमपूज्य, बोधिसत्व, महामानव, युगपुरुष, घटनापती, महाविद्वान, दलितांचे कैवारी, स्त्री उद्धारक होते. माणूस उपासमारीने अशक्त होऊन अल्पायुषी होतो, तसा तो शिक्षणाअभावी जिवंतपणी दुसऱ्याचा गुलाम होतो, असे डॉ. बाबासाहेबांचे शब्द आहेत." याची जाण करून दीली. कार्यक्रमाचे संचालन शिक्षीका कांचन वानखडे तर आभार प्रदर्शन आशा हिवरकर यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षक उषा जगदाळे, सुरेश सुरत्न, गोपाल वानखडे, प्रशांत काळे, अश्विनी सोळंके, सुकेशनी ओहेकर, छाया इंगळे, आणि पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी परिश्रम घेतले.

### पातूर येथे नवीन प्रवेशित ...

यांनी महाविद्यालयातील विभागांची माहिती दिली. उपप्राचार्य डॉ. अभय भुस्कळे यांनी आयुर्वेदातील संशोधन संभावना बद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी धनंजय मिश्रा यांनी केले. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात महाविद्यालयाचे अधीक्षक संतोष सोमाणी, शरद अवचार, रमेश पोहरे, फारुख भाई यांचे योगदान राहिले.



# रोटरीचे महारक्तदान शिबीर आठ डिसेंबरला

**अकोला:** शासकीय आणि खाजगी रुग्णालयात रक्ताची कमतरता असल्याने रुग्णसेवा बाधित होत आहे. थॅलेसेमियाच्या रुग्णांच्या उपचारात खंड पडत असून काही शस्त्रक्रिया पुढे ढकलण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. अशावेळी रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० ने रुग्णसेवा आणि समाजिक सेवेच्या उद्देशाने महारक्तदान शिबिराचे आयोजन आठ डिसेंबरला करण्यात येणार आहे. रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थ, अग्रवाल समिती, अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशन आणि इतर संस्थांनी मिळून सोमवारी सकाळी नऊ ते दुपारी तीन वाजेपर्यंत स्थानीय आरएलटी कॉलेज ऑफ सायन्स सिव्हिल लाईन रोड येथे महारक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

रोटरी डिस्ट्रिक्ट ३०३० चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर ज्ञानेश्वर शेवाळे यांच्या नेतृत्वात रोटरी क्लब ऑफ अकोला नॉर्थच्या अध्यक्ष डॉ. श्रद्धा सलामपुरिया अग्रवाल, सचिव प्रा. महेश बाहेती, अग्रवाल समितीचे अध्यक्ष दीपक गोयंका, सचिव विनोद टोरका, अकोला जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सत्यनारायण बाहेती, सचिव एकनाथराव उके, प्रकल्प प्रमुख गोपाल अग्रवाल एड रवी शर्मा आणि अन्य सदस्य हे परिश्रम करीत आहेत.

## थोडक्यात महत्वाचे

### थकित करापोटी पश्चिम झोन येथील मालमत्तावर सीलची कारवाई



**अकोला:** मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, उपायुक्त विजय पारतवार आणि सहा.गजानन घोंगे यांच्या मार्गदर्शनात अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पश्चिम झोन अंतर्गत डाबकी रोड येथील रेणुका नगर स्थित वार्ड क्रं. बी-६ मालमत्ता क्रं. ३४५, श्रीमती पार्वताबाई दांदळे यांचेकडे २०१७-१८ पासून आज पर्यंतचे एकुण रक्कम रूपये २,२५,५५१/- एवढा मालमत्ता कर थकित असल्याने त्यांच्या मालमत्तावर सील लावण्याची कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईत सहा.कर अधिक्षक राजेश जाधव, कर वसुली लिपिक राजेश धारस्कर, प्रकाश मालगे, मुदस्सर अमीन, सै.अजहर, सुनिल गरड आदींची उपस्थिती होती.

### शेगाव पायी वारी दिंडी व पालखी सोहळा

**अकोला:** नामजप प्रसारार्थ शास्त्री नगरातील जय गजानन चौकातून शेगाव पायीवारी दिंडी व पालखी सोहळ्याचे आयोजन राजे शिवछत्रपती मंडळ व शास्त्री नगरवासी यांच्या वतीने केले आहे. गेली १६ वर्षे वारी काढण्यात येत आहे. यावेळी रविवार, १४ डिसेंबर रोजी सकाळी सहा वाजता आकाशवाणी मागील जय गजानन चौकातून शेगाव करता वारकरी प्रस्थान करतील. समस्त भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने वारीमध्ये सहभागी व्हावे असे आवाहन राजे शिवछत्रपती मंडळाचे अध्यक्ष पिंटू टेकाडे आणि सहका-यांनी केले आहे.

### जठारपेठ भागात १,००० कापडी पिशव्यांचे मोफत वितरण

**अकोला :** पर्यावरण संरक्षण अंतर्गत 'झाड पाणी पॉलिथीन' या तीन आयामांपैकी पॉलिथीन निर्मूलन या आयामावर आधारित कचरा निर्मूलन व पर्यावरण संवर्धन या उद्देशाने जठारपेठेतील महाकाली नगर संघाच्या व मै वसुधा विकासचे डॉ.योगेश व डॉ. मनीषा पालीवाल यांच्या वतीने नागरिकांसाठी एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहे.

पर्यावरण संरक्षण

या उपक्रमांतर्गत समाजातूनच जुन्या, वापरात नसलेल्या साड्या संकलित करून त्या गरजू कामगारांकडून कापडी पिशव्या तयार करून घेण्यात आल्या. अशा प्रकारे सुमारे १,००० टिकाऊ कापडी पिशव्या शिवून तयार करण्यात आल्या. पर्यावरणपूरक या पिशव्या प्लास्टिकच्या वापराला पर्याय ठरून प्लास्टिक निर्मूलन व कचरा कमी करण्यासाठी मोलाचे योगदान देतील.

या कापडी पिशव्यांचे मोफत वितरण रविवार, दिनांक ०७ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता स्थळ, गिरीधर डेअरी, सम्राट हॉटेलच्या बाजूला, महाकाली नगर, जठारपेठ, अकोला येथे करण्यात येणार आहे.

त्यामुळे पर्यावरण संरक्षणात आपले योगदान देण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पर्यावरण संरक्षण गतिविधी, अकोला महानगर यांच्या वतीने करण्यात आले आहे

# हिवरखेड -चिचारी- चंदनपूर- धोंडा आखर रस्त्याचे काम युद्ध स्तरावर पूर्ण होणार

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**हिवरखेड:** हिवरखेड, चिचारी, चंदनपूर आणि धोंडा आखर या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या इको-सेन्सिटिव्ह झोनमध्ये असलेल्या आदिवासी गावांना जोडणारा रस्ता गेल्या दशकभरापासून प्रलंबित होता. शिक्षण, आरोग्य, बाजारपेठ, दळणवळण व शासकीय सेवांपासून तुटलेला हा भाग विकासाकडे पाहत होता, परंतु पर्यावरणीय नियमांमुळे हा प्रस्ताव सतत अडचणीत होता.

दहा वर्षांहून अधिक काळ हा प्रस्ताव विविध कारणांमुळे विलंबित राहिला. स्थानिक राजकीय अनास्थेमुळे हे काम बरीच वर्षे प्रलंबित होते. मेळघाटच्या पर्यावरणीय संवेदनशीलतेमुळे वन विभाग, पर्यावरण विभाग, जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय अनेक मंजुऱ्या आणि तांत्रिक अहवाल इत्यादी अडचणीही होत्या. परंतु सामाजिक कार्यकर्त्यांच्या सातत्याच्या पाठपुराव्याने



रस्त्याचे काम आता युद्धस्तरावर पूर्ण होणार आहे. वन विभागाची परवानगी मिळाल्यानंतर मुख्यमंत्री व प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या अधिकाऱ्यांनी मंजुरीच्या आधारे प्रारंभिक कामे सुरू केली असून सर्व्हे, मोजमाप, मार्किंग, भू-तांत्रिक परीक्षण आणि रस्त्याची साफसफाई सुरु झाले असल्याची माहिती दिली आहे. शासकीय अभियंत्यांनी स्पष्ट शब्दांत विश्वास दिला आहे की हे काम उपलब्ध कामकाजाच्या हंगामात पूर्ण करून मार्च–एप्रिल २०२६ पर्यंत रस्ता तयार करू. विस्थापित गावाच्या लोकांनी, जागरूक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी ह्या रस्त्याचा मुद्दा नजरेस आणून दिल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते रजनीश पोटे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे मुख्य अभियंता संभाजी माने यांच्याशी मार्च २०२५ मध्ये सविस्तर बैठक आणि चर्चा केली होती.

प्रकल्पाची तांत्रिक माहिती, पर्यावरणीय अटी, मार्गातील अडथळे, पूर्वीचे अपुरे प्रस्ताव इत्यादींवर स्पष्ट माहिती दिली गेली. कॉंक्रीट रस्ता पर्याय शक्य नसल्याचे लक्षात आल्यानंतर डांबरी (BT) रस्त्याचा व्यावहारिक पर्याय निश्चित करण्यात आला. त्यानुसार अंतर्गत प्रस्ताव आर्थिक आणि तांत्रिक बाजूने विचार करून मंजूर करण्यात आला. अमरावती, नागपूर आणि अकोट येथील वन अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात आला.

मेळघाट आणि हिवरखेड, चिचारी, चंदनपूर आणि धोंडा आखर भागातील शेतकरी , आदिवासींच्या जीवनातील वास्तविक बदल घडवू शकणारा हा ऐतिहासिक मार्ग आहे. राजकीय नेत्यांनी निवडणुकांमध्ये लाभ मिळविण्यासाठी वर्षभरापूर्वी भूमिपूजन करून श्रेयवाद लाटून घेतले होते. परंतु रस्त्याचे काम प्रत्यक्षात सुरु करण्यात त्यांना यश आले नाही. सामाजिक कार्यकर्ता म्हणून सातत्याने पाठपुरावा केला. त्याला अनेक जागरूक नागरिकांची, पत्रकारांची, आणि विविध अधिकाऱ्यांची साथ मिळाली. त्यामुळे रस्त्याच्या कामाला सुरुवात होत आहे.

**रजनीश पोटे,**
सामाजिक कार्यकर्ता पुणे.

हा रस्ता होण्यासाठी आम्ही सातत्याने आवाज उठवीत होतो. त्याला रजनीश पोटे यांच्या पुढाकारातून यश आले. ह्या रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी, रूग्णांचा प्रवास सुलभ होईल. पुनर्वसित आदिवासी कुटुंबांचे जीवनमानात सुधार होईल.

**धीरज बजाज,**
सामाजिक कार्यकर्ता, हिवरखेड

मी व माझ्या काही मित्रांनी चिचारी चंदनपूर गावातील काही गावकऱ्यांच्या सहकार्याने हा रस्ता दुरुस्त व्हावा याकरिता आंदोलन केले होते,

**अर्जुन खिरोडकार**
सामाजिक कार्यकर्ते, हिवरखेड

# पंचशीलनगरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन



प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अकोला :** स्थानिक वाशिम बायपास रोडवरील पंचशीलनगर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात बौद्ध वंदनेने करण्यात आली. त्यानंतर बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून तसेच परिसरातून कॅन्डल मार्च काढून त्यांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विचार मांडताना उपस्थितांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधान निर्मितीतील योगदानाबद्दल आणि सामाजिक न्याय, समानता व बंधुता या मूल्यांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन व स्त्री-पुरुष समानतेवरील बाबासाहेबांच्या विचारांचा आजच्या काळात अवलंब करण्याची ➤ पान २ वर

# मूर्तिजापूरातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा गाजावाजा

## ◆ डेकोरेशनला प्राधान्य, शिक्षण मात्र दुय्यम

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**मूर्तिजापूर :** शहरात तसेच शहरालगत उभ्या राहिलेल्या काही स्वयंघोषित नामांकित इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढवण्यासाठी बाह्य देखाव्यावर प्रचंड भर देण्यास सुरुवात केली आहे. आकर्षक सजावट, रंगीत कॉरिडॉर, मोठे गेट-आर्च, फॅन्सी वर्गखोली असा सारा थाटमाट उभा केला जात असताना शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून पालक व स्थानिकांमध्येही या विषयावर जोरदार चर्चेला उधाण आले आहे.

अनेक पालकांनी नाव न घेण्याच्या अटीवर व्यक्त केलेल्या नाराजीनुसार, शाळेची फी भरल्यानंतर दिल्या जाणाऱ्या पावतीवर ठट्युशन फीठ असा उल्लेख असतो. तरीही अनेक शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना बाहेरून ट्युशन लावण्याचा सल्ला पालकांना दिला जातो. त्यामुळे शाळेला दिलेली फी नेमकी कुठल्या सेवेसाठी? असा वाजवी प्रश्न पालक विचारत आहेत.शैक्षणिक गुणवत्तेत त्रुटी असल्यामुळे शाळा स्वतःच विद्यार्थ्यांना बाहेरील शिकवणींची गरज भासवते, यावर पालकांचे रोष वाढत आहे. शाळा सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन ओळखपत्रे देणे ➤ पान २ वर

# कृषी विभागामार्फत जागतिक मृदा दिनानिमित्त विशेष जनजागृती उपक्रम



प्रतिनिधी ६ डिसेंबर

**मुर्तिजापूर :** ५ डिसेंबर रोजी 'जागतिक मृदा दिन' तालुक्यात सर्व कृषी सहायक अधिकारी यांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे यांनी तालुक्यातील सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना गावोगावी जाऊन शेतकऱ्यांशी थेट संवाद साधण्याचे निर्देश दिले होते. या उपक्रमांतर्गत अधिकाऱ्यांनी मातीचे आरोग्य, त्याचे संवर्धन आणि शाश्वत शेती पद्धती याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. अधिकाऱ्यांनी सांगितले की, माती ही खनिजे, सेंद्रिय पदार्थ, सूक्ष्मजीव, पाणी आणि हवा यांचे नैसर्गिक मिश्रण असून अन्न उत्पादनाची ही अत्यंत महत्त्वाची पायाभूत साधनसामग्री आहे. मातीतील सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी ➤ पान २ वर

# उज्वल पब्लिक स्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी अभिवादन




प्रतिनिधी ६ डिसेंबर


**बोरगाव मंजू :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त उज्वल पब्लिक स्कूल, बोरगाव मंजू येथे ६ डिसेंबर रोजी प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार नरेंद्र सोनवणे होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. उज्वला नरेंद्र सोनवणे यांनी प्रास्ताविकात डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश ➤ पान २ वर

# ग्रामीण पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड; चार जुगारी अटकेत

वि.प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अकोट:** अकोट ग्रामीण पोलीस स्टेशनच्या पथकाने अंजनगाव रोडवरील पठार नाल्याजवळ सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकत चार जुगारी ईसमांना रंगेहाथ पकडले. या कारवाईत एकूण ६८,१७० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



०५ डिसेंबर रोजी पो.उप.नि.मिनाक्षी काटोले या कर्मचाऱ्यांसह परिसरात पेट्रोलींग करत असताना गुप्त बातमीदाराकडून खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार पठार नाल्याजवळ काही इसम ५२ पत्यांवर 'तीन पत्ती परेल' नावाचा जुगार पैशाच्या हारजीतवर खेळत असल्याची माहिती मिळताच पथकाने पंचांसह तात्काळ छापा टाकला. धाडीत खालील चार जुगारी इसमांना अटक करण्यात आली नदीम खाँ मुस्ताक खाँ (वय ३७), रा. इफतेखार प्लॉट, अकोट, शाम मोहनलाल ठाकुर (वय ४५), रा. गवळीपुरा, अकोट, विष्णु प्रल्हाद कायवाटे (वय २५), रा. ढोरपुरा, अकोट, आशिष ब्रिजमोहन शर्मा (वय ५२), ➤ पान २ वर

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335
अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605
येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634
वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878
यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816
मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789
पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616 | बातम्यासाठी संपर्क 9075012801

# पातूर येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी 'आयुर–पर्यवेक्षिका' कार्यक्रम उत्साहात

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**पातूर:** डॉ. वंदनाताई जगन्नाथराव ढोणे ग्रामीण आयुर्वेद महाविद्यालय येथे नवीन प्रवेश घेतलेल्या बीएएमएस विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'आयुर–पर्यवेक्षिका' विशेष उपक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांना आयुर्वेदाचा व्यापक इतिहास, महाविद्यालयाची वैशिष्ट्ये, शैक्षणिक सुविधा, हॉस्पिटलची रचना, रुग्णसेवेची पद्धत, तसेच आयुर्वेदातील भविष्यातील संधी यांची माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद संचालक डॉ. साजिद शेख यांनी भूषविले. विद्यार्थ्यांचे स्वागत करताना त्यांनी सांगितले, तुम्ही



डॉक्टर होण्याच्या प्रवासाची आज पहिली पायरी चढत आहात. आयुर्वेद केवळ उपचारपद्धती नसून, एक जीवनदर्शन आहे. हे महाविद्यालय तुमचा सर्वांगीण विकास घडवण्यासाठी कटिबद्ध आहे. प्रमुख अतिथी गुरू देव सेवा मंडळ मोझरीचे डॉ. पोदाळे म्हणाले, आयुर्वेद शास्त्र जगभर झपाट्याने विस्तारत आहे. विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे हे शिक्षण घेतले तर समाजाला आरोग्याच्या दिशेने नवे योगदान देता येईल. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. जयश्री काटोले ➤ पान २ वर

# खेंडकर ज्ञानगंगेमध्ये महापरिनिर्वाण दिना निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अकोला:** वाशिम बायपास, मोडके वाडी स्थित खेंडकर ज्ञानगंगेमध्ये महापरिनिर्वाण दिना निमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे खेंडकर शाळेचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर, तर प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य खाजगी शिक्षक संघटनेचे उपाध्यक्ष व खेंडकर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खेंडकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



दरम्यान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करण्यात आले. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित वर्ग पाच ते दहा मधील विद्यार्थ्यांमध्ये भाषण स्पर्धेचे आयोजन ➤ पान २ वर

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन : “तुझ्या रक्तामधला भिमराव पाहिजे”

## ♦ यवतमाळात ‘महारक्तदान शिबिर’; आंबेडकरी अनुयायांचा उत्स्फूर्त सहभाग

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**यवतमाळ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त संविधान विचार मंचच्या वतीने शहरात महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. “तुझ्या रक्तामधला भिमराव पाहिजे” या अर्थपूर्ण घोषवाक्याने प्रेरित या उपक्रमात आंबेडकरी अनुयायांनी उत्साहाने रक्तदान करत बाबासाहेबांना अनोख्या पद्धतीने अभिवादन केले.

सकाळपासून संविधान चौकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हारार्पण व अभिवादन करण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत होती.




महिलांचा सहभागही लक्षणीय होता. महापरिनिर्वाण दिनानिमित्त सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम राबविण्याचा निर्धार यावेळी आयोजकांनी व्यक्त केला.

रक्तदानासोबत ‘एक वही, एक पेन’ हा उपक्रमही राबविण्यात आला. शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी समाजातील विद्यार्थ्यांना मदत व्हावी, हा त्यामागील उद्देश होता. नागरिकांनी या उपक्रमाला मोठा प्रतिसाद देत वह्या व पेनचे वाटप केले. संविधान विचार मंचच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले



की, “बाबासाहेबांनी दिलेल्या मानवतावादी मूल्यांनुसार समाजासाठी काहीतरी करायचे, हीच या उपक्रमाची प्रेरणा आहे. रक्तदान करणे म्हणजे दुसऱ्या जीवाला नवी संजीवनी देणे, आणि तेच आज प्रत्येक रक्तदात्याने करून दाखवले.” महापरिनिर्वाण दिनी घेतलेल्या या उपक्रमामुळे सामाजिक भान, लोकसहभाग आणि आंबेडकरी विचारसरणीचे सामर्थ्य स्पष्ट झाले. यवतमाळात दरवर्षी असे कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होतात आणि यंदा नागरिकांनी दाखवलेली उत्स्फूर्तता विशेषत्वाने लक्षवेधी ठरली.





डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करतांना आ. बाळासाहेब मांगुळकर व कार्यकर्ते

# रेती तस्करीतील चार ट्रॅक्टर पकडले

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**महागाव :** जिल्ह्यातील अवैध धंदे रोखण्याच्या मोहिमेला वेग देत स्थानिक गुन्हे शाखेने आज ५ डिसेंबर रोजी महत्त्वाची कारवाई केली. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या सूचनेनुसार महागाव पोलीस ठाणे हद्दीतील पैनगंगा नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध, विना परवाना रेती उत्खननावर छापा टाकत तब्बल १६ लाख २४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चार ट्रॅक्टरसह रेती असा संपूर्ण माल ताब्यात घेण्यात आला आहे.

उमरखेड उपविभागात ऊहापोह गुन्हे व आरोपी शोध मोहिमेदरम्यान पथकाला मिळालेल्या गोपनीय



माहितीनुसार ही कारवाई करण्यात आली. मिळालेल्या संकेतांनुसार फुलसावंगी हद्दीतील हिंगणी–पादन रोडवर सापळा रचण्यात आला. त्यावेळी पैनगंगा नदीपात्रातून अवैधपणे रेती भरून नेत असलेले चार ट्रॅक्टर अडवून ताब्यात घेण्यात आले.

या कारवाईत अमोल शामराव नखाते (रा. फुलसावंगी), संदीप यादव राहटे (रा. चिंचोली), गजानन बापूराव आवळे (रा. हिंगणी, ता. माहूर) आणि अक्षय गणेश इंगोले (रा. हडसनी, ता. माहूर) यांना पकडण्यात आले. संबंधित आरोपींवर पोलीस स्टेशन महागाव येथे कलम ३०३(२) भा.द.वि. सह महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(८) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि पोलीस निरीक्षक सतीश चवरे (स्थानीय गुन्हे शाखा, यवतमाळ) यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात सपोनि धिरज बांडे, पोउपनि शरद लोहकरे, मुन्ना आडे, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, सुनील पंडागळे, रविंद्र शिरामे आणि राजेश जाधव यांनी संयुक्त सहभाग घेतला. अवैध रेती उत्खननाविरोधातील जिल्हा पोलिसांची ही आणखी एक प्रभावी कारवाई ठरली आहे.

# सराफा व्यापाऱ्याच्या घरफोडीचा उलगडा

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**यवतमाळ :** वणी शहरातील सराफा व्यापाऱ्याच्या घरफोडीप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) वेगवान कारवाई करत 13 लाख 22 हजार 835 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. चार अज्ञात आरोपींनी दहशत माजवत व्यापाऱ्याच्या घरातून सोन्या- नगदीची चोरी केल्यानंतर एलसीबीने तपासाची चक्रे वेगाने फिरवत तीन संशयितांना ताब्यात घेतले असून उर्वरित चार आरोपींचा शोध सुरू आहे.

ही घटना 29 नोव्हेंबर रोजी पहाटे दोनच्या सुमारास घडली. संत गाडगे बाबा चौक, वणी येथील कोंडावार ज्वेलर्सचे मालक संजय निळकंठ कोंडावार (74)



यांच्या घरी चार अज्ञात व्यक्तींनी प्रवेश करून त्यांनी आणि सुरक्षा रक्षकाला चाकूचा धाक दाखवत मारहाण केली. त्यानंतर सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा 12 लाख 85 हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या प्रकरणी वणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्ह्याची गंभीरता लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाच्या विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानंतर एलसीबीच्या पथकाने तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज तसेच गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपासाची दिशा निश्चित केली. तपासादरम्यान गोधणी कोठा मुलकी येथील सागर बजरंग धोंगडे (34) याचा या गुन्ह्यात सहभाग असल्याची माहिती एलसीबीला मिळाली. त्यानुसार दाते कॉलेज चौकाजवळ पथकाने सागर धोंगडेला ताब्यात घेऊन कौशल्यपूर्ण चौकशी केली असता, त्याने वैशाली संजय वाघमारे (रा. न्यु नरसाळा, नागपूर) हिच्या मदतीने पाच साथीदारांसह गुन्हा केल्याची कबुली दिली. एलसीबीने आरोपींकडून 65,835 रोख, 11,87,000 किमतीचे सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल, दोन मोबाईल असा एकूण 13,22,835 किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. यानंतर एलसीबी आणि वणी पोलीसांनी वैशाली वाघमारे तसेच ऋतिक लीलाधर गेडाम (21, रा. विठ्ठलवाडी) यांना ताब्यात घेतले असून उर्वरित आरोपींचा सक्रिय शोध सुरू आहे. ही कारवाई अ.पो.अ. अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली एलसीबीचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे, पोलीस अधिकारी दत्ता पेंडकर, धनराज हाके आणि संपूर्ण एलसीबी पथक तसेच वणी पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी संयुक्तपणे केली.

# उसाला आग; दहा लाखांचे नुकसान

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**महागाव :** तालुक्यातील मौजे वेणी (बु.) येथे विद्युत तारेच्या शॉर्ट सर्किटमुळे उसाच्या पिकाला लागलेल्या आगीत अपंग शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. ही घटना ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी अंदाजे ११ वाजता घडली.

शेतकरी माणिकराव नागोराव पुंडे यांच्या सर्वे क्र. १०४ मधील अंदाजे १ हेक्टर ५८ आर (सुमारे ४ एकर) क्षेत्रातील ऊस पीक क्षणात भक्ष्यस्थानी पडले. आगीत ऊसासोबतच शेतीतील स्प्रिंकलर आणि अन्य शेती उपयोगी साहित्यही नष्ट झाले. एकूण नुकसान सुमारे १० लाख रुपये असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, शेतातून जाणारी विद्युत तार तुटून स्पार्किंग झाल्याने आग भडकली. आगीने काही मिनिटांत संपूर्ण ऊसपट्टा जळून खाक झाला. घटनेची माहिती



मिळताच तलाठ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. तसेच कृषी विभागाकडेही अहवाल सादर करण्यात आला आहे. संबंधित शेतकरी हा अपंग असून शेती हा कुटुंबाचा एकमेव उदरनिर्वाहाचा मार्ग आहे. झालेल्या नुकसानीसाठी त्यांनी विद्युत विभाग, पोलीस ठाणे, तहसील कार्यालय आणि कृषी विभाग यांच्याकडे लेखी अर्ज करून नुकसान भरपाईची मागणी केली आहे. स्थानिक स्तरावर शेतकऱ्याला तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करावी, अशी मागणी होत आहे.

# महात्मा ज्योतीबा फुले नाट्यगृहाचे नामकरण अद्याप अपूर्ण

## ♦ अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आक्रमक

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**यवतमाळ :** नगरपरिषदे मार्फत 2007 मध्ये महात्मा ज्योतीबा फुले नाट्यगृह असे नामकरण ठरावित असूनही, प्रशासनाने अद्याप त्याच्या फलकाची बसवणी न करता तसेच निवडणूक कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण पत्रात चुकीच्या नावाचा उल्लेख केल्याने नाट्यप्रेमी सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये संताप वाढला आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या शिष्टमंडळाने निवासी जिल्हाधिकार, उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन दिले. त्यांनी पुढील आदेशांमध्येही नाट्यगृहाचे योग्य नाव नमूद




करावे. त्वरित नामफलक बसवावे, अशी मागणी केली. त्वरीत कारवाई न झाल्यास उपोषण आणि आत्मदहन करण्यासही ते मागेपुढे पाहणार नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. मागील सहा महिन्यांपासून महाराष्ट्राचे मंत्री आणि माजी मंत्री यांनी प्रशासनाला फलक बसवण्याचे आदेश दिले, तरीही प्रशासनाने अद्याप कृती केली नाही. सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की नाट्यगृहाकडे वारंवार दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे नागरिकांमध्ये रोष पसरला आहे. प्रशासनाने दखल घेतली नाही तर आंदोलन, आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. या शिष्टमंडळात सुनयना येवतकर, उत्तमराव खंदारे, शितल घावडे, प्रांजली गोलाईत, अबोली देशमुख, जया इंगोले, मनोज भबूतकर यांचा समावेश आहे.

# लाडकी बहिण केवायसीला वेग

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**यवतमाळ, :** ‘माझी लाडकी बहिण’ योजनेचा लाभ सुरू राहण्यासाठी सर्व लाभार्थ्यांनी केवायसी तसेच आधार–मोबाईल लिंकिंग त्वरित पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे. केवायसी व मोबाईल जोडणी प्रक्रिया जलद पूर्ण करण्यासाठी इंडियन पोस्ट पेमेंट्स बँक (IPPB) मार्फत जिल्हास्तरीय विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत पोस्टमन व ग्रामीण डाक सेवकांच्या माध्यमातून लाभार्थ्यांना मिशन मोडमध्ये आवश्यक सहाय्य दिले जाणार आहे. महिलांसाठी उपलब्ध असलेल्या विविध विमा व संरक्षण योजनांची माहिती देऊन त्या योजनांचा लाभ घ्यावा, असेही यावेळी सांगण्यात आले. अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचविण्यासाठी प्रशासनाकडून प्रभावी नियोजन करण्यात आले आहे.

# खून प्रकरणी आरोपीला जन्मठेप

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**यवतमाळ :** किरकोळ वादातून खून केल्या प्रकरणी आरोपीला जन्मठेप व २५ हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली. जिल्हा न्यायाधीश १ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. यु. बघेले यांनी हा निकाल दिला.

हुसेन पांडुरंग तापडु, वय ४० वर्षे, रा. नरसापुर, ता. कळंब असे आरोपीचे नाव आहे. तर प्रकाश विठ्ठल जांभुळकर मृतकाचे नाव आहे. १३ ऑक्टोबर २०२० रोजी सायंकाळी आरोपी घराच्या मागील अंगणात स्वयंपाक करताना शिवीगाळ करत होता. समजावण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रकाश जांभुळकर यांच्यावर आरोपीने घरातून चाकू आणून पोटाजवळ वार केला. गंभीर जखमी अवस्थेत कळंब ग्रामीण रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. अनिता कैलास जांभुळकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून कळंब पोलिसांनी गुन्हा नोंद केला. तपास पोलिस निरीक्षक विजय राठोड यांनी पूर्ण केला. न्यायालयात फिर्यादी, डॉ. रवि पाटील व तपास अधिकाऱ्यांची साक्ष ठोस ठरली. जिल्हा न्यायाधीश १ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. यु. बघेले यांनी आरोपीला जन्मठेप, २५,००० दंड अशी कठोर शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास दोन वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली असून दंडाची संपूर्ण रक्कम मयताची पत्नी उर्मिला जांभुळकर यांना नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले. सरकारी पक्षाची वतीने सहायक सरकारी वकील ॲड. उदय पांडे यांनी युक्तीवाद केला. तर पैरवी अधिकारी हवालदार विजय कुडमेथे यांनी सहकार्य केले.

# वक्फ संपत्ती पंजीकरणासाठी ‘उम्मीद’ पोर्टलची मुदतवाढ; खा. संजय देशमुख यांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी ६ डिसेंबर

यवतमाळ : जिल्ह्यातील अरबी मदरसे, धारुलउलूम, दर्गा शरीफ, कब्रस्तान, मस्जिद समित्या तसेच विविध धार्मिक संस्थांनी वक्फ संपत्ती पंजीकरणासाठी ‘उम्मीद’ पोर्टलची मुदत वाढविण्याची मागणी करत जिल्हाधिकारी यवतमाळ आणि यवतमाळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजय भाऊ देशमुख यांची भेट घेतली. प्रतिनिधी मंडळाने यासंदर्भात लेखी निवेदनही सादर केले.

या मागणीची तात्काळ दखल घेत खासदार संजय देशमुख यांनी केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयास



ई-मेलद्वारे मागणी कळवून पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्यास यश मिळत भारत सरकारने उम्मीद पोर्टलवरील वक्फ संपत्ती पंजीकरणाची तीन महिन्यांची मुदतवाढ जाहीर केली आहे.

सरकारच्या या निर्णयामुळे जिल्ह्यातील मुस्लिम समाजात समाधान व्यक्त केले जात असून, खासदार संजय भाऊ देशमुख, जिल्हाधिकारी यवतमाळ तसेच या विषयात सहकार्य करणारे माध्यम प्रतिनिधी व मान्यवर यांचे आभार मानण्यात आले.

या प्रसंगी मुफ्ती मोहम्मद शफीकोदीन सिद्दीकी, मौलाना काजी वसीम, मौलाना अब्दुल शारीक, मौलाना मोहम्मद अनीस, मौलाना मोहम्मद रजा कादरी, सिकंदर शाह, डॉ. मुजीब शेख, अली इम्रान, शमशोदीन मलनस, जैनुल सिद्दीकी यांच्यासह विविध समाज बांधव उपस्थित होते.

# उमरखेडमध्ये रस्त्याचे काम निकृष्ट

## ♦ नागरिकांमध्ये संताप, चौकशीची मागणी

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**उमरखेड :** शहरातील एचएएम योजनेअंतर्गत सुरू असलेल्या रस्ताकामाच्या निकृष्ट गुणवत्तेमुळे नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. गंगनमाळ ते हरदडा फाटा या मार्गावर निविदेनुसार काम सुरू असूनही फक्त काही शंभर मीटर काम तातडीने पूर्ण करण्यात आले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लक्ष वेधण्यासाठी काम करण्यात आल्याची शंका व्यक्त केली आहे.

मागील वर्षभर नागरिकांनी रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नगरपालिकेला वारंवार निवेदन दिले, तरी कामाच्या गुणवत्तेत सुधारणा नाही. रस्त्याची पृष्ठभाग लवकर फाटणे, असमान



बांधकाम आणि वापरलेल्या साहित्याची तुटवड्यामुळे नागरिकांमध्ये संताप वाढला आहे. स्थानीय नागरिकांच्या मागण्यांनुसार गुणवत्तेची सखोल चौकशी करून आवश्यक कारवाई केली जावी, अशी मागणी जोर धरत आहे. काही नागरिकांनी चेतावणी दिली की, प्रशासनाकडून तातडीने कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा मार्ग अवलंबण्यात येईल. उमरखेडमध्ये या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये चर्चा मोठ्या प्रमाणावर सुरु असून, प्रशासन पुढील टप्प्यात कसे पाऊल उचलते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# मुख्यमंत्री साहेब आले, सागर कोकासने आंदोलन केले, रस्त्याचे काम सुरू झाले !

## वाशीम शहरातील मुख्य रस्ते रातोरात हातोहात...

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

विकासाच्या नावावर हजारो कोटीचे कामे करूनही शहर भकास झाले आहे. नागरिकांना मुलभूत समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. शहरवासीयांना विविध समस्यांना तोंड  घ्यावे लागत आहेत.  शिवाय शहरातील रस्तेही १२ वर्षात ५ वेळा होवूनही रस्तेच नव्हे तर नागरिकांचे जीवनच खड्ड्यात गेले आहे. तुम्ही निवडणूक प्रचारासाठी येत असल्यामुळे शहरातील रस्ते तातपूर्ते का होईना रातोरात हातोहात दुरूस्त झाले आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो आमआदमी पार्टीचे उमेदवार सागर कोकास यांनी आंदोलन करून केला होते. या संबंधिचे सर्वप्रथम मुख्यमंत्री साहेब, तुमच्या मुळे तातपुर्ते रस्ते दुरूस्त असे वृत्त लावून सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम लक्ष वेधले. सागर कोकासच्या आंदोलनाला यश आले असून सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्ताची दखल घेत मुख्यमंत्री गेल्यानंतरही शहरातील मुख्यमार्गाचे काम सुरू झाले आहेत.

## बातम्या खास, दखल हमखास, सिटी न्युज सुपरफास्ट



### समस्यांच्या गर्तेत जीवन जगताहेत वाशिमकर

२८ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून रस्त्यांची स्वच्छता झाली, रस्त्यावरील खड्डे बुजविले. मात्र, गेल्या कित्येक वर्षांपासून वाशिम शहारातील प्रत्येक नागरिक दररोज याच खड्ड्यांतून ये-जा करतोय, त्यांची हाडे दररोज खिळखिळी होताहेत. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय दररोज वाशिम ला आल्यास किमान येथील जनतेला चांगल्या सुविधा तरी मिळतील, अशी माफक अपेक्षा आपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकास यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर तातपूरर्ते का होईना आता निवडणुकीसाठी दिखावा म्हणून मुख्यरस्त्यावरील कामांना सुरूवात झाली आहे. मात्र, सागर कोकास यांच्या आंदोलनामुळेच हे कामे होत असल्याची चर्चा वाशीम शहराच्या मतदारामध्ये आहे.





### ‘सिटी न्युज सुपरफास्ट’ चा सततचा पाठपुरावा...

सर्व सामान्यांच्या समस्यांसाठी सांध्य दैनिक सिटी न्युज सुपरफास्ट शासन दखल घेईपर्यंत सततचा पाठपुरावा करीत असते. त्यामुळेच १३ वर्षात लोकांच्या मनामनातून घराघरात सिटी न्युज सुपरफास्ट पोहोचला आहे. शहरातील विविध समस्यांच्या प्रत्येक विषयांच्या हजारो वृत्त मालिकेची श्रृंखला सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरली आहे. शहरातील समस्यांसाठी सदैव प्रथम पुढाकार घेवून समस्या मार्गी लागेपर्यंत शेकडो वृत्तातून वृत्त मालिकेच्या माध्यमातून सततचा पाठपुरावा करीत असल्याने सिटी न्युज सुपरफास्टने जनसामान्यांच्या मनात घराघरात स्थान निर्माण केले आहे. त्याचाच परिणाम म्हणून समस्यांच्या वृत्तांच्या कात्रनाचे बॅनर शहरात आंदोलनाच्या वेळी लागत असतात.




दि २८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून, प्रशासनाने नियोजित मार्गावरील खड्डे तासाभरात बुजविले, जागोजागी स्वच्छता केली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गेल्या कित्येक महिन्यांपासून असलेली समस्या १० मिनीटांत मार्गी लावली, ह्या सर्व बाबी पाहून आम आदमी पार्टीचे वाशिम नगर परिषद नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकास हे व्यथित झाले. त्यामुळे सागर कोकास यांनी ‘मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या’ असे पोस्टर हाती घेऊन, वाशिम करांना होणाऱ्या त्रासाची बाब अधोरेखीत केली. शहराच्या रस्त्याविषयी फक्त सिटी न्युज सुपरफास्टने शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली. मुख्यमंत्री येणार त्या दिवशीच मुख्यमंत्री साहेब तातपूर्ती का होईना रस्ते दुरूस्त, प्रशासन सुस्त, नागरिक त्रस्त या आशयाचे वृत्त प्रकाशित केले होते. आणि विविध समस्यांची जाणीव करून दिली. त्यानंतर सागर कोकास यांनी रस्त्यावर उतरून अभिनोव आंदोलन केले. मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो काढला. त्यामुळे आता निवडणुकीच्या तोंडावर दिखावा म्हणून वाशीम शहरातील कामे तातपुर्ते का होईना




सुरू झाले आहेत. पुसद नाका चौकातील काम, राजेंद्र प्रसाद शाळेमागील काम, बाकलीवाल शाळेसमोरील काम, अशा अनेक रस्त्याचे काम सागर कोकास यांच्या आंदोलनामुळे सुरू झाल्याची चर्चा आहे.

वाशिम नगर परिषद निवडणुकीच्या तोंडावर वाशिम शहराचा विकास प्रत्येक राजकीय पक्षांकडून केल्या जातो. मात्र, शहरात रस्त्यावर पडलेले खड्डे, सांडपाण्याचे व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, टेंपल गार्डनची झालेली दुरावस्था, रखडलेले नाट्यगृह, बंद असलेले पथदिवे, मुख्य शहरात रस्ता नाही, पण जिथे घर नाही अशा भागात सिमेंटचे रस्ते अशा एक नाही, अनेक समस्या वाशिम शहरात आ वासून उभ्या आहेत.

२८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वाशिम शहरात आले होते. त्यांनी शहर विकासाची आश्वासने दिली. मात्र, वाशिमकर नागरिक दररोज कुठल्या परिस्थितीत जीवन जगतोय, याची त्यांना कल्पनाच नाही. त्यामुळे आम आदमी पार्टीचे वाशिम नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकस यांनी ‘मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या’ असे आवाहन करणारे पोस्टर दाखविले. कारण, गेल्या कित्येक वर्षांपासून रस्त्यावरील खड्डे जसेच्या तसेच आहेत, पिण्याचे पाणी वेळेवर मिळत नाही, जागोजागी कचऱ्याचे ढिग साचले, बंद अवस्थेत असलेले पथदिवे आदि समस्यांचा वाशिमकर दररोज सामना करीत आहेत. मात्र, मुख्यमंत्री शहरात येणार असल्यामुळे प्रशासनाने अगदी तासाभरात रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता तयार केला. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय रोज शहरात आले तर, वाशिमकरांना चांगल्या सुविधा तरी मिळतील, या अपेक्षेपोटी ‘मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या’ असे आवाहन केले. सागर कोकास यांच्या या आवाहनाच्या शहरातील प्रत्येक मतदाराच्या तोंडी चर्चा सुरू होती. त्यानंतर शहरातील रखडलेल्या कामाला सुरूवात झाली आहे .

# कारंजा शहरात नकली नोटाचे बंडल ताब्यात !

### *नकली नोटाचा वापर निवडणूकी मध्ये झाला का ?*कारंजा पोलिसांची मोठी कारवाई

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

कारंजा शहरात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असून, सामान्य लोकांना फसवण्याचे नवीन नवीन प्रकार वापरले जात आहे. त्यामध्येच दिनांक ४ डिसेंबर रोजी गवळीपुरा येथे एका घरावर छापा मारून त्याच्याकडून नकली नोटाचे ( लहान मुलांच्या खेळण्यातील नोटा) भरलेली बॅग जप्त करण्यात आली. सविस्तर माहिती अशी की पोलिसाला मिळालेल्या माहितीनुसार मनोरा येथील एका मोठ्या व्यापाऱ्याला अशाच नकली नोटा (मनोरंजन) देऊन फसवण्यात आल्याची माहिती मिळाली होती.या माहितीच्या





आधारेच कारंजा पोलिसांनी गवळीपुरा येथील हसन उर्फ इमी छट्टू निमसुरवाले वय ४० वर्ष याच्या घरावर छापा मारून बागेमध्ये भरलेले शेकडो नकली नोटाचे बंडल ताब्यात घेतले.त्यानंतर ह्या नोटा लहान मुलांच्या खेळण्यातील म्हणजे (मनोरंजन) अशा असून त्यावर काही खऱ्या नोटा ठेवून पुढील व्यक्तीची फसवणूक करण्याचा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे.या नोटाचा वापर कारंजा नगरपरिषद निवडणूक मध्ये करण्यात आला असल्याचा सुद्धा संशय आहे.तसेच कारंजा शहरांमध्ये तर कोणाला फसवण्यात आले नाही ना हे सर्व प्रकार पोलीस तपासात पुढे येईल.

# तऱ्हाळा येथे ‘रामचंद्र- भरत भेट’ यात्रा महोत्सव

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

तालुक्यातील ग्राम तऱ्हाळा, येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री संत भायजी महाराज संस्थान तऱ्हाळा येथे प्रभु श्री रामचंद्र भरत भेट यात्रा महोत्सव गुरुवार, दि. ०४ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या महोत्सवात परिसरातील हजारो भाविक-भक्तांनी दर्शनासोबतच महाप्रसादाचा मोठ्या संख्येने लाभ घेतला.

यावर्षीच्या यात्रा महोत्सवानिमित्त भाविकांसाठी तब्बल ७० क्विंटल रामलाडूचा भव्य महाप्रसाद तयार करण्यात आला होता. दुपारी ३ वाजता महाप्रसादाचे वितरण सुरु झाले, जे जवळपास रात्री १० वाजेपर्यंत अविरतपणे चालू होते. या महाप्रसाद वाटपासाठी परिसरातील अनेक भाविक-भक्तांनी स्वयंसेवा करत सक्रिय सहभाग नोंदवला. ऑटो युनियन व सामाजिक कार्यकर्ते रवि पाटील राऊत यांच्या पुढाकाराने यात्रेत ये-जा करणाऱ्या भक्ता करीता मोफत प्रवासाची सोय करण्यात आली होती. शेलुबाजार ते तऱ्हाळा यात्रेत ये-जा करणाऱ्या भाविक भक्ता करिता ऑटो युनियन कडून ऑटोची मोफत सेवा देण्यात आली होती. ऑटो ला लागणारे डिझेलचा खर्च रवि पाटील राऊत व मित्र मंडळींनी दिला. यामुळे सर्व भक्त मंडळींना ये-जा करण्यासाठी सोयीचे झाले.





### परिसरातील हजारो भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

तऱ्हाळा परिसरातील ऑटो युनियन कडून मागील १० वर्षा पासुन यात्रे च्या दिवशी मोफत सेवा दिली जाते. यात्रा महोत्सवाचा मुख्य भाग म्हणून दुसऱ्या दिवशी, शुक्रवार, दि.०५ डिसेंबरच्या पहाटे पाच वाजता पारंपारिक पद्धतीने रामचंद्र आणि भरत भेटीचा हृदयस्पर्शी कार्यक्रम झाला. या कार्यक्रमानंतर लगेचच रावण आणि कुंभकर्ण यांच्या पुतळ्यांचे दहन करण्यात आले.

कडाक्याच्या थंडीची पर्वा न करता, परिसरातील भाविक-भक्तांनी मोठ्या उत्साहात आणि प्रचंड प्रमाणात ’रावण दहन’ पाहण्यासाठी गर्दी केली होती, ज्यामुळे महोत्सवाच्या उत्साहात आणखी भर पडली.

## थोडक्यात

### एड्स जनजागृती रॅली



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

कनिष्ठ महाविद्यालय टू च्या वतीने एडस दिन साजरा करण्यात आला ’या कार्यक्रमाला कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर आर. एम. पाटील यांनी रॅलीला झेंडा दाखवू मार्गस्थ केले यावेळी मुलांनी स्लोगन दिले ’ एडस टाळूया समाज घडवूया ’ यावेळी एनएसएस अधिकारी प्राध्यापक डी. डी. आघम, प्राध्यापक डॉक्टर माथूकर  व सर्व ज्युनिअर सीनियर चे प्राध्यापक वृंद उपस्थित होते तसेच विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.

# निळ्या पाखरांचे महामानवाला अभिवादन !

### * कॅन्डलमार्चची १९ वर्षाची परंपरा कायम * ठिकठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन

•सिटी न्युज ब्युरो@ वाशीम•

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडक यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आज सकाळी पाहटे ५.३० मिनीटाने कॅन्डलमार्च काढून महामानवाला निळ्या पाखराने डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकातील पुतळ्यासमोर एकत्र येवून अभिवादन केले. या कॅन्डलमार्च रॅलीची परंपरा गेल्या १९ वर्षापासून वाशीम शहरात जोपासल्या जात आहे.

कार्यक्रम डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये घेण्यात आले. सर्वप्रथम पुज्य भन्ते यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करून त्रिशरण पंचशिल घेण्यात आले या सदरील कार्यक्रमास वाशिम शहरातील प्रत्येक नगरातून हातात मेनबत्ती घेऊन आंबेडकरी अनुयाची डॉ. बाबासाहेबाना अभिवादन करण्यासाठी हजारोंच्या संख्येने बाबासाहेबाच्या पुतळ्याजवळ रॅलीने आले. आंबेडकर चौकात आकर्षक सजावट करण्यात आली.





कार्यक्रमासाठी त्रिरत्न बुध्द विहार चॅरीटेबल ट्रस्ट, वाशीम, भारतरत्न प.पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल ॲक्टिवा फोरम वाशीम, संघमित्रा धम्मसेवा महिला मंडळ, वाशिम, बौध्द कर्मचारी प्रबोधन मंडळ, वाशीम, बौध्द युवा संघ, वाशीम, जंबुद्विप संघ वाशीम, समता सैनिक दल वाशीम, भारतीय बौध्द महासभा, मंगलमैत्री महिला मंडळ, बुध्द विहार समन्वय महासंघ, भिमनगर बुध्द विहार समन्वय समिती, अकोला नाका बुध्द विहार समन्य समिती, सम्यक आजिवीका बि.सी. संघ, वाशिम तथा समस्त बौध्द बांधव वाशिम यांनी  परिश्रम घेतले.

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरात निघाला भव्य कॅन्डल मार्च

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अकोला :** भारतरत्न बोधिसत्व परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवारी रात्री शहरात भव्य कॅन्डल मार्च चे आयोजन करण्यात आले

या कॅन्डल मार्चमध्ये सर्व बौद्ध उपासक उपासिका पुरुष व महिला तसेच युवक युवतींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती शहरात प्रत्येक वर्षी महापरिनिर्वाण दिनाच्या पूर्वसंध्येला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी कॅन्डल मार्च आयोजन केले जाते शुक्रवारी रात्री शहरातील टॉवर चौकातून या कॅन्डल मार्च चे आयोजन करण्यात आले टॉवर चौकातून निघालेला हा कॅन्डल मार्च बस स्टँड समोरून अशोक वाटिकेत पोहोचला याप्रसंगी सर्व बौद्ध उपासक उपासिकांनी श्वेत वस्त्र धारण करीत या कॅन्डल मार्चमध्ये आपले उपस्थिती दर्शवली त्याचबरोबर शहरातील विविध भागातून निघालेले कॅन्डल मार्च सुद्धा या मुख्य कॅण्डल मार्चमध्ये सामील झाले होते अशोक वाटिकेत पोहोचल्यानंतर कॅण्डल मार्चमध्ये शामिल सर्वांनीच त्रिशरण पंचशील ग्रहण केले तसेच बाबासाहेबांच्या पुतळ्यासमोर हजारो मोहम्मद त्या लावीत त्यांना अभिवादन करण्यात आले या कॅन्डल मार्चमध्ये वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच समता सैनिक दलाचे सदस्य तसेच शहरातील विविध बुद्ध विहार समन्वय समितीचे पदाधिकारी व परिसरातील नागरिक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते बाबासाहेबांच्या





➤ पान २ वर

# नरनाळा महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी

♦ ३० जानेवारी ते १ फेब्रुवारीदरम्यान भव्य आयोजन

वि प्रतिनिधी ६ डिसेंबर




**अकोट:** सातपुड्यात वसलेल्या मेळघाटची समृद्ध वनसंपदा, ऐतिहासिक किल्ल्यांचे वैभव आणि आदिम जमातींच्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा 'नरनाळा महोत्सव' १३ वर्षांनंतर पुन्हा आयोजित होत आहे. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या या भव्य महोत्सवासाठी तयारीला वेग आला असून, सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी अकोट येथे घेतलेल्या बैठकीत दिले.

या महोत्सवात पर्यटक, निसर्गमित्र आणि वनप्रेमींसाठी सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असण्याबरोबरच अनेक वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. मेळघाटचे वनवैभव आणि आदिम संस्कृती यांचे दर्शन घडवणारे उपक्रम महोत्सवाला विशेष रंगत आणणार आहेत. नौकाविहार, जंगल सफारी, पक्षीनिरीक्षण, आदिवासी लोकनृत्य व सांस्कृतिक कार्यक्रम, गडभटकंती, गिर्यारोहण आणि इतर साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन, नरनाळा किल्ल्याचे ऐतिहासिक दर्शन, वनपर्यटन, साहस, संस्कृती, इतिहास आणि स्थानिक परंपरा यांचा संगम असलेला हा महोत्सव पर्यटकांसाठी पर्वणी ठरणार असून, जिल्हा प्रशासन, वनविभाग आणि इतर सर्व यंत्रणांनी तयारीला सुरुवात केली आहे.

# भाजी बाजार पार्किंगची बनवली कचरा कुंडी

वाहने कुठे लावावी असा प्रश्न पडतो



प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अकोला :** जनता भाजी बाजार विविध समस्यांनी वेढलेला आहे. बाजाराच्या बाजूला मोकळ्या जागेत पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. परंतु या ठिकाणी कचरा टाकला जात आहे. त्यामुळे दुचाकी चारचाकी वाहने कुठे पार्क करावी असा प्रश्न निर्माण झाला आहे. महापालिका बाजार विभाग याकडे लक्ष देईल का अशी विचारणा होत आहे. जनता भाजी बाजाराच्या आत देखील कचरा दिसतो. गुरेढोरे फिरत असतात. तसेच कचरा टाकण्यासाठी केलेल्या खड्ड्या जवळून जाणे कठीण होते. इतकी दुर्गंधी राहते. या भागातील अस्वच्छता कमी झाली ➤ पान २ वर

# 'सावकारग्रस्त' शेतकऱ्यांचा धडक मोर्चा

♦ १२ डिसेंबरला नागपुरात धरणे आंदोलन

वि प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अकोट :** राज्यात जाचक व अवैध सावकारीमुळे होत असलेल्या शेतकरी-श्रमिकांच्या आत्महत्या, तसेच सावकार पिढीत अडकलेल्या जनतेच्या विविध प्रश्नांवर तोडगा निघावा यासाठी महाराष्ट्र सावकारग्रस्त शेतकरी समिती हिवाळी अधिवेशनावर धडक आंदोलन करणार आहे. नागपूर येथे ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान १२ डिसेंबर रोजी धंतोली स्टेडियमवर एकदिवसीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

समितीच्या मते, महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अस्तित्वात येऊन १२ वर्षे झाली असली तरी कायद्यातील त्रुटींमुळे त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. सहकार विभागातील काही प्रशासकीय अधिकारी सावकारांच्या बाजूने निर्णय देत असल्याचा आरोप समितीने केला आहे. त्यामुळे सावकारी कायदा 'दात नसलेल्या वाघासारखा' ठरत असून गेल्या १२ वर्षांत केवळ १ टक्के पिढीत शेतकऱ्यांना न्याय मिळाल्याचे समितीचे म्हणणे आहे. या आंदोलनाचे ➤ पान २ वर

# माता न तू वैरिणी, लाकडी पलंगात स्वत :च्या मुलाला ठेवले डांबून

पोलिसांनी कारवाई करीत केली मुलाची सुटका शहरातील कौलखेड परिसरातील घटना

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अकोला :** खदान पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या कौलखेड प्रादेशिक परिवहन कार्यशाळे नजीक साईनाथ कॉलनीत एका मानसिक आजारी महिलेने तिच्या ९ वर्षांच्या मुलाला लाकडी पलंगाच्या कप्प्यात डांबून ठेवले होते. माहिती मिळताच खदान पोलिसांनी बचाव मोहीम राबवून मुलाला वाचवले. मानसिकरित्या आजारी महिला तिच्या ९ वर्षांच्या मुलासह तिथे राहते. खदान पोलिस, यवतमाळ येथील नंददीप फाउंडेशन मानसिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी तसेच साईनाथ कॉलनीतील रहिवासी आणि पूर्व नगरसेवक विनोद मापारी यांच्यासह घटनेची चौकशी करण्यासाठी महिलेच्या घरी गेले,





तेव्हा त्यांना ती तिच्याच घरात राहत असल्याचे आढळले. सुमारे २० दिवसांपासून ती महिला तिच्या लहान मुलासह बाहेर दिसली नसल्याची माहिती मिळाल्यानंतर परिसरातील नागरिकांना संशय आल्याने त्यांनी पोलिसांना माहिती दिली , त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन तिची चौकशी केली असता, ही महिला तिच्या घरात अत्यंत घाणेरड्या आणि दुर्गंधीयुक्त ➤ पान २ वर

# शेगांव येथे राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन



प्रतिनिधी ६ डिसेंबर

**खामगांव :** महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग संघटनेतर्फे शतक महोत्सवी वर्षात वरिष्ठ पुरुष व जिजाऊ चषक युवा महिला स्पर्धेचे शेगाव येथे आयोजन केले आहे. या स्पर्धेचे आयोजक बुलढाणा जिल्हा बॉक्सिंग असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग असोसिएशन संघटनेच्या माध्यमातून संतनगरी शेगांव येथे ९ ते १४ डिसेंबर दरम्यान आयोजन करत आहे.

मातृतीर्थ बुलढाणा जिल्ह्यात राजमाता जिजाऊ चॅम्पियनशिपचे बॉक्सिंग संघटना प्रथमच आयोजित करत आहे, महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, जय कवळी, भरतकुमार वावळ, राजेश देसाई आणि जितू तावरे या मान्यवरांना महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे नवनिर्वाचित कार्याध्यक्ष विठ्ठलराव लोखंडकार यांचे विनंती वरून ➤ पान २ वर

## सिटी न्यूज सुपरफास्ट — अमरावती जिल्हा

# प्रधान सचिव व इतर मंत्रालयीन अधिकारी यांचा मेळघाट दौरा

प्रतिनिधी ६ डिसेंबर



**धारणी :** जनहित याचिका क्रं १३३/२००७ च्या अनुषंगाने धारणी व चिखलदरा मेळघाट येथील सोयी सुविधा प्रत्यक्ष पाहणी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील आदिवासी बहुल भागातील जनतेकरीता शासनामार्फत पुरविण्यात येणारी विविध सोयी सुविधाची प्रत्यक्ष पाहणी करिता प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, . प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग, मा. प्रधान सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय मुंबई व इतर मंत्रालयीन अधिकारी यांचा मेळघाट दौरा चिखलदरा तालुक्यातील काही ठराविक बिहाली, जारीदा, राहू, हतरु, घटांग , कोयलारी,पाचडोंगरी, खंडुखेडा,खडीमल, इत्यादी गावे करून धारणी तालुक्यातील लवादा, बैरागड, रंगुबेली, बुजुधावाडी, कलमखार व उपजिल्हा रुग्णालयातील सोयी सुविधा पाहण्यात आल्या. मेळघाटातील कुपोषण आणि आरोग्य समस्या लक्षात घेता महिला व बालविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. अनुप यादव यांचा सुरू झालेला दौरा अत्यंत महत्त्वाचा मानला जात होता मात्र दौऱ्याच्या पहिल्याच दिवशी त्यांच्या पाहणीचा रुक्ष व औपचारिकतेचा स्वर उघड झाल्याची टीका स्थानिक पातळीवर जोर धरत आहे. राज्याचे प्रधान सचिव ➤ पान २ वर

# पोलिसांविरुद्धच्या तक्रारींसाठी अमरावतीत 'विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण' कार्यान्वित

सामान्य नागरिकांच्या तक्रारींची दखल, चौकशी व कारवाईचे प्राधिकरणास अधिकार

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अमरावती :** पोलीस विभागाकडून अधिकारांचा गैरवापर किंवा गैरवर्तन झाल्यास नागरिकांना निष्पक्ष चौकशीसाठी स्थानिक पातळीवर व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण(ॐ) स्थापन करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने हे प्राधिकरण स्थापन केले असून या प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी निवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती उषा ठाकरे या कार्यरत आहे. तसेच, पी. टी. पाटील (निवृत्त पोलीस अधीक्षक) हे सदस्य आणि पंकज निखार हे नागरी सदस्य म्हणून आपापली जबाबदारी सांभाळत आहेत. सामान्य नागरिकांना पोलीस विभागाविरुध्द काही तक्रार असल्यास याठिकाणी त्यासंदर्भात दाद मागावी, असे आवाहन विभागीय पोलीस तक्रार प्राधिकणाचे कार्यालय प्रमुख तथा पोलीस उप आयुक्त रमेश धुमाळ यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, अमरावती विभाग, अमरावतीचे ➤ पान २ वर

# ग्रामीण पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांचे वेतन दोन महिन्यांपासून प्रलंबित

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अमरावती :** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील नियमित व कंत्राटी कर्मचारी मागील दोन महिन्यांपासून वेतनाशिवाय कार्यरत आहेत. या गंभीर परिस्थितीमुळे कर्मचाऱ्यांच्या घरखर्च, शिक्षण, कर्जफेड, वैद्यकीय सुविधा आणि मानसिक आरोग्यावर तीव्र परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेने जलपुरवठा व स्वच्छता विभागाचे माननीय मंत्री . गुलाबराव पाटील, राज्य मंत्री मेघना साकोरे-बोरडिकर तसेच सचिव, जलसंपदा विभाग यांच्याकडे लेखी तसेच ईमेलद्वारे निवेदन पाठवले असून तात्काळ कार्यवाहीची मागणी केली आहे.

**संघटनेनी उपस्थित केलेले मुद्दे :** वतन न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांची आर्थिक व मानसिक परिस्थिती गंभीर होणार असल्यास त्यांनी सांगितले. क कर्जांचे हप्ते थकण्याची वेळ, आरोग्य विमा हप्ते भरणे अशक्य होईल. शासन निर्देशानुसार दर महिन्याच्या १ तारखेला वेतन देणे बंधनकारक असूनही नियमाचे उल्लंघन होत आहे. १ डिसेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार ३० जिल्ह्यांना २२१५१८८१ लेखाशिर्षांतर्गत वेतनकरिता तरतूद देण्यात आली आहे. मात्र अमरावती जिल्हा परिषदेला वेतनासाठी कोणतीही तरतूद मिळालेली नाही, ज्यामुळे नोव्हेंबर २०२५चे वेतन देखील प्रलंबित राहिले आहे. संघटनेने या बाबत भेदभाव झाल्याचा आरोप केला असून तात्काळ चौकशी करण्याची मागणी केली आहे.

**संघटनेच्या प्रमुख मागण्या :**

अमरावती जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागातील प्रलंबित वेतन तात्काळ अदा करावे. प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला वेतन देण्याच्या शासन निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करावी. जिल्हावार तरतुदींमध्ये समानता राखून अमरावतीला न्याय देण्यात यावा. अमरावती जिल्ह्याला तरतूद न देण्यामागील ➤ पान २ वर

# व्हॉट्सअॅपवरील मतदार यादीबाबत उपविभागीय अधिकाऱ्यांकडून खुलासा

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अमरावती :** अमरावती तहसील कार्यालयात सन २००२ ची मतदार यादी उपलब्ध असल्याचा एक व्हॉट्सप संदेश सध्या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फिरत आहे. परंतु, हा संदेश पूर्णपणे चुकीचा आणि दिशाभूल करणारा असल्याचे उपविभागीय अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे. माहितीनुसार, ४ डिसेंबर २०२५ रोजी व्हॉट्सपवर एक संदेश प्रसारित झाला होता, ज्यात अमरावतीतील ज्या महिला परराज्यात स्थलांतरित आहेत, विशेषतः जिथे 'एसआयआर' प्रक्रिया सुरू आहे, त्यांच्या आई-वडिलांचे नाव सन २००२ च्या मतदार यादीत शोधण्यासाठी अमरावती तहसील कार्यालयात ती यादी उपलब्ध असल्याचा दावा करण्यात आला होता.तहसील कार्यालयाच्या निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कार्यालयात सन २००२ ची मतदार यादी उपलब्ध नाही. या कार्यालयात नागरिकांसाठी सन २००४ ची मतदार यादी उपलब्ध आहे. उपविभागीय अधिकारी यांनी अमरावती अंतर्गतच्या सर्व मतदारांना कळविले आहे की, त्यांनी व्हॉट्स अॅपवरील या चुकीच्या संदेशावर विश्वास ठेवू नये. ज्यांना २००४ ची मतदार यादी हवी आहे, त्यांनी थेट तहसील कार्यालय, अमरावती येथील निवडणूक विभागात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# निरूपमा देशपांडे यांना सामाजिक कार्य गौरव पुरस्कार

प्रतिनिधी ६ डिसेंबर

**धारणी:** संपूर्ण बांबू केंद्र लवादा, या संस्था च्या वतीने समाजासाठी निःस्वार्थ वृत्तीने, कोणत्याही अपेक्षेशिवाय, सातत्याने कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या समर्पणाला योग्य मान्यता मिळावी, त्यांच्या कार्यातून समाजाला प्रेरणा मिळावी आणि त्यांच्या वाटचालीचा आदर्श पुढील पिढीसमोर उभा रहावा याच उदात्त भावनेतून महाराष्ट्र लोक विकास मंच कार्यरत आहे. सदर सामाजिक कार्य गौरव पुरस्कार श्रीमती निरूपमा देशपांडे यांना देण्यात आला.




मंचाच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, कृषीविकास, पर्यावरण, महिला व किशोरी सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय व मोलाची भूमिका बजावणाऱ्या कार्यकर्त्यांना दरवर्षी सामाजिक कार्य गौरव पुरस्कार प्रदान करून गौरविण्याची परंपरा आम्ही जपली आहे.आपण आपल्या आयुष्याची अनेक सुवर्ण वर्षे समाजकार्यास अर्पण केली. वंचित, दुर्बल आणि मागास घटकांच्या उन्नतीसाठी आपला सातत्यपूर्ण प्रयत्न, संवेदनशील दृष्टीकोन, जबाबदारीची जाणीव आणि कार्यातील प्रामाणिक बांधिलकी आम्हाला अंतःकरणापासून स्पर्शन गेली आहे. आपल्या अथक परिश्रमांमुळे अनेकांच्या जीवनात नवा प्रकाश, नवी आशा, नवी दिशा निर्माण झाली आहे. समाजपरिवर्तनाच्या वाटेवर आपण उभारलेला हा दीपस्तंभ अनेक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणेचा अढळ स्त्रोत आहे. आपल्या या विलक्षण कार्याचा आदर म्हणून, महाराष्ट्र लोक विकास मंचतर्फे २०२५ मधील सामाजिक कार्य गौरव पुरस्कार साठी आपली निवड करण्यात आली आहे.

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे यशस्वी आयोजन




प्रतिनिधी ६ डिसेंबर

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट विभागातर्फे 'ऐीहुपहगु ूर्पींम्प् णल्र्लूि ूद्द्र्िर्ुअ, घ्ईं इल्हगु ईद्दर्ज्दे' या महत्त्वपूर्ण विषयावर सहा दिवसीय फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (इॐ) चे आयोजन दिनांक २४ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत यशस्वीरीत्या करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया आणि उपप्राचार्य डॉ. मोहम्मद जुहेर यांच्या हस्ते झाले. संशोधन संस्कृती सक्षम करण्याच्या दृष्टीने आयोजित या इॐ मध्ये विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित तज्ज्ञांनी प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. यात डॉ. सुनीता डोल(घ्ऊ, सोलापूर), डॉ. उज्वला गावंडे (अँह नागपूर), डॉ. देवेंद्र शहारे (भ्ण्ण् नागपूर), प्रा. व्हि. पी. काटेकर (मुंबई), डॉ. ए. बी. गडीचा (अमरावती), ➤ पान २ वर

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK